दैनिक
# लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ
www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com + 91 97023 86118
●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-३०६ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, शनिवार, २७ एप्रिल २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

## 'माझे मत वर्षा ताईला, ती खासदार म्हणून दिल्लीत जाईल' : उद्धव ठाकरे
### संयुक्त पत्रकार परिषदेत व्यक्त केला विश्वास



■ मुंबई, यश सावंत : मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड यांना काँग्रेसकडून मुंबई उत्तर मध्य लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर झाल्यानंतर त्यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत माझे मत वर्षा ताईला मिळणार असून ती खासदार म्हणून दिल्लीत जाईल, असा शब्द उद्धव ठाकरे यांनी दिला.

तत्पूर्वी उद्धव ठाकरे यांनी ईशान्य मुंबईचे उमेदवार संजय दिना पाटील व कल्याण लोकसभेच्या उमेदवार वैशाली दरेकर यांना एबी फॉर्म दिले. त्यानंतर वर्षा गायकवाड यांच्यासोबत उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेतली. उमेदवारी मिळाल्याबद्दल वर्षा गायकवाड यांचे अभिनंदन करताना माझे मत वर्षाताईंना देईन आणि त्या खासदार होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

उद्धव ठाकरे म्हणाले, ''वर्षाताई गायकवाड मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा आहेत. जरी त्या मुंबई दक्षिण मध्यमधून इच्छुक होत्या, परंतु त्यांना आता उत्तर मध्यमधून उमेदवारी मिळाली आहे. त्या कुठूनही लढू शकतात आणि जिंकू शकतात. माझे मत त्यांना देणार आहे, त्यामुळे त्या नक्की विजयी होऊन दिल्लीला जातील.''

अजित पवार यांच्यावरील सिंचन घोटाळ्याचा आरोप, तसेच शिखर बँक घोटाळ्याबाबत भाजपमधील लोक आरोप करत होते. तेच लोक त्यांच्याकडे गेल्यानंतर त्यांना क्लीन चीट कशा मिळाल्या, असे लोक विचारत असल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले. नाना पटोले म्हणतात तसे काही लोक खेळणे आहेत, जशी चावी दिली जाईल तसे ते खेळतात, अशी टीकाही उद्धव ठाकरे यांनी केली.

## महाराष्ट्रातील दुष्काळात चारा पाठविला म्हणून मोदींनी अमूलच्या प्रमुखांवर खटला भरला होता : शरद पवार



■ सोलापूर, विशाल पाटील: दहा वर्षांपूर्वी महाराष्ट्रात दुष्काळ पडला असताना आमच्या विनंतीनुसार गुजरातच्या अमूल कंपनीने जनावरांना जगविण्यासाठी चारा पाठवला होता. त्यावेळी गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी होते. परंतु अमूलने महाराष्ट्रात चारा पाठविल्याने चिडून मोदी यांच्या गुजरात सरकारने अमूलच्या प्रमुखांवर खटला भरला होता. महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्तांच्या जनावरांसाठी चारा पाठविणे हा अमूल कंपनीचा गुन्हा होता का, असा सवाल करीत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते शरद पवार यांनी, आज तेच मोदी पंतप्रधान आहेत. त्यांचे धोरणे शेतकरीविरोधीच आहेत, असा आरोप केला.

माढा लोकसभेचे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या प्रचारार्थ करमाळा येथे आयोजित जाहीर सभेत पवार यांनी पंतप्रधान मोदी यांच्यावर तिखट शब्दात हल्लाबोल केला. या सभेत शिवसेना शिंदे गटाचे करमाळ्याचे माजी आमदार नारायण पाटील यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश केला. यावेळी ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील हे उपस्थित होते.

पवार म्हणाले, महाराष्ट्रात दुष्काळ पडला होता. त्यावेळी मुक्या जनावरांना जगविण्यासाठी उसाचा वाढा हाच चारा होता. मात्र जनावरे उसाचे वाढे खात नव्हती. त्यामुळे आम्ही विनंती करून गुजरातच्या अमूल कंपनीकडून चारा मागितला. त्यांच्या अधिकाऱ्यांनी महाराष्ट्रात येऊन दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली होती. त्यानंतर त्यांनी गुजरातमधून चारा पाठवला होता. परंतु त्यामुळे गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांनी अमूलच्या प्रमुखांवर खटला भरला असा आरोप पवार यांनी केला.

## सर्वोच्च न्यायालयाचे डिजिटायझेशन
### व्हॉट्सॲपद्वारे खटले, सूचीबद्ध प्रकरणांची मिळणार माहिती

■ नवी दिल्ली, प्रगती शर्मा : सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी डिजिटायझेशनच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, गुरुवारी सर्वोच्च न्यायालय व्हॉट्सॲप संदेशांद्वारे वकिलांना खटले दाखल करणे आणि सूचीबद्ध करण्याशी संबंधित कारण सूची आणि माहिती सामायिक करेल, अशी घोषणा केली. सरन्यायाधीश म्हणाले की याचा खूप प्रभावशाली परिणाम होईल आणि हे पाऊल कागद आणि पृथ्वी वाचविण्यास मदत करेल.

व्हॉट्सॲपच्या माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान (आयसीटी) सेवांसह एकीकरणाची घोषणा सरन्यायाधीशांनी त्यांच्या नेतृत्वाखालील नऊ न्यायमूर्तींच्या खंडपीठाने खासगी मालमत्तांचा विचार केला जाऊ शकतो की नाही या याचिकांमुळे उद्भवलेल्या त्रासदायक कायदेशीर प्रश्नावर सुनावणी सुरू करण्यापूर्वी केली होती. राज्य धोरणाच्या निर्देशात्मक तत्त्वांचा (डीपीएसपी) भाग असलेल्या घटनेच्या अनुच्छेद ३९(ब) अंतर्गत खासगी मालमत्तांना 'समाजाची भौतिक संसाधने' मानता येईल का, असा प्रश्न याचिकांमध्ये विचारण्यात आला होता.

सरन्यायाधीश म्हणाले, ''सर्वोच्च न्यायालयाच्या अमृत महोत्सवात आम्ही एक छोटी योजना सुरू केली आहे. व्हॉट्सॲप आपल्या दैनंदिन जीवनाचा एक भाग



बनले आहे आणि एक शक्तिशाली संज्ञापन साधनाची भूमिका बजावत आहे. न्याय मिळवण्याच्या अधिकाराला बळकटी देण्यासाठी आणि न्याय व्यवस्थेत पारदर्शकता वाढवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने आपल्या माहिती तंत्रज्ञान सेवांचे व्हॉट्सॲपबरोबर एकत्रीकरण करण्याची घोषणा केली आहे. या उपक्रमांतर्गत 'ॲडव्होकेट्स ऑन रेकॉर्ड' आणि सर्वोच्च न्यायालयासमोर वैयक्तिकरित्या उपस्थित राहणाऱ्या याचिकाकर्त्यांना ऑनलाइन दावे, याचिकांची यादी, आदेश आणि निकाल यासंबंधी स्वयंचलित संदेश प्राप्त होतील, असेही न्यायमूर्ती चंद्रचूड म्हणाले. वेबसाइटवर उपलब्ध असलेले आदेश आणि निर्णय व्हॉट्सॲपच्या माध्यमातून पाठवले जातील, असे त्यांनी सांगितले. महाधिवक्ता तुषार मेहता यांनी सरन्यायाधीशांच्या या निर्णयाचे स्वागत केले. 'हे एक क्रांतिकारक पाऊल आहे,'' असे ते म्हणाले.

## भारतीय सागरी नियंत्रण रेषा ओलांडून पाकहद्दीत गेलेल्या १८३ खलाशांपैकी ३५ खलाशांची होणार सुटका

■ पालघर, सचिन कदम: भारतीय सागरी नियंत्रण रेषा ओलांडून पाक हद्दीत गेल्याने पाकिस्तान कैदेत असणाऱ्या सुमारे १८३ कैद्यांपैकी ३५ कैद्यांची सुटका येत्या ३० एप्रिल रोजी होणार आहे. यामध्ये डहाणू तालुक्यातील पाच खलाशांचा समावेश असून ही मंडळी २-३ मे पर्यंत घरी पोहोचण्याची शक्यता आहे. गुजरात राज्याच्या मासेमारी बोटींवर खलासी म्हणून काम करताना देशाची हद्द ओलांडल्याने बोटीनसह त्यावरील अनेक खलाशाला पाकिस्तान तटरक्षक दलाने कैदी बनवले असून ते तेथील तुरुंगात शिक्षा भोगत आहेत. यापैकी अनेक कैद्यांची शिक्षा कार्यकाळ संपला असला तरी विविध तांत्रिक मुद्द्यांमुळे, राष्ट्रीयत्व सिद्ध करण्यासाठी पुरेशी पुरावे सादर केले न गेल्याने तसेच दोन्ही देशांमधील तणावपूर्ण वातावरणामुळे त्यांना



अजूनही तुरुंगात राहावे लागत आहे. यासाठी विविध पातळीवर प्रयत्न सुरू असताना अटकेत असणाऱ्या खलाशांपैकी ३५ खलाशांना पाकिस्तान सरकार ३० एप्रिल रोजी वाघा बॉर्डर येथे भारतीय दूतवासांच्या प्रतिनिधींकडे हस्तांतरण करणार असल्याची माहिती पत्रकार जतिन देसाई यांनी दिली आहे. त्यानंतर या खलाशांना गुजरात राज्यात आणून त्यांची छाननी करून त्यांना मूळ गावी परत पाठवण्यात येणार असल्याने पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यात असणाऱ्या पाच खलाशांना आपल्या नातेवाईकांची भेट मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात होईल अशी अपेक्षा आहे.

## मुंबई महानगरपालिकेची अभिमानास्पद कामगिरी
### कोस्टल रोडवर महाकाय गर्डरची केली यशस्वी जोडणी



■ मुंबई, विशाल कारंडे: बृहन्मुंबई महानगरपालिकेने अभिमानास्पद कामगिरी पार पाडली आहे. महत्त्वाकांक्षी मुंबई कोस्टल रोड प्रकल्पाने शुक्रवारी दिनांक २६ एप्रिल २०२४ रोजी पहिली महाकाय तुळई (बो आर्च स्ट्रिंग गर्डर) यशस्वीपणे स्थापन केली आहे. शुक्रवारी पहाटे मुंबई कोस्टल रोड आणि वांद्रे-वरळी सागरी सेतू मार्गाला जोडणारे गर्डर बसवण्यात आले आहे.

बीएमसीने यासंदर्भातील माहिती सोशल मीडियावर दिली आहे. बीएमसीने आपल्या पोस्टमध्ये म्हटलंय की, पहाटे २ वाजेपासून सुरू झालेली ही मोहीम पहाटे ३ वाजून २५ मिनिटांनी यशस्वीपणे पार पडली. या अभियांत्रिकी कामगिरीमुळे महानगरपालिकेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. सदर ऐतिहासिक क्षणांचे साक्षीदार होण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी स्वतः प्रकल्प स्थळी उपस्थित होते.

कामगिरीबद्दल उपआयुक्त (विशेष अभियांत्रिकी) श्री. चक्रधर कांडलकर, प्रमुख अभियंता (मुंबई किनारी रस्ता प्रकल्प) श्री. गिरीश निकम यांच्यासह मुंबई किनारी रस्ता प्रकल्पाचे सर्व संबंधित अधिकारी, अभियंता, कर्मचारी यांचे महानगरपालिका आयुक्त श्री. गगराणी, अतिरिक्त आयुक्त डॉ. सैनी यांनी अभिनंदन केल्याचं, असं बीएमसीने ट्वीटमध्ये म्हटलंय. स्थापन केलेली तुळई (गर्डर) ही वरळीकडून नरिमन पाईंट दिशेला जाणाऱ्या मार्गावर स्थापन करण्यात आली.

ही तुळई दोन हजार मेट्रीक टन वजनाची असून १३६ मीटर लांब आणि १८ ते २१ मीटर रुंद आहे. लवकरच दुसरी तुळई देखील स्थापन केली जाणार आहे. त्यानंतर उर्वरित कामे पूर्ण करून मुंबई किनारी रस्त्याचा पुढील टप्पा देखील सुरू होईल, अशी माहिती देण्यात आली आहे.

## आचारसंहिता भंगप्रकरणी अजित पवारांना क्लीनचिट
### त्याबद्दल निवडणूक अधिकाऱ्यांनी दिला निर्वाळा

■ पुणे, अभिजित येरल्लू: राजकीय वर्तुळातून बातमी समोर आली आहे. आचारसंहिता भंगप्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवारांना क्लीनचिट मिळाली आहे. आचारसंहिता भंग झाली नाही, असा निर्वाळा देखील निवडणूक अधिकाऱ्यांनी त्याबद्दल दिला आहे. अजित पवारांनी केलेल्या वक्तव्यात उमेदवाराचं नाव नव्हतं, असंही क्लीनचिटमध्ये म्हटलं आहे. बारामती लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक अधिकारी कविता द्विवेदी यांनी या बाबतचा अहवाल पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांना सादर केला आहे. १७ एप्रिल रोजी अजित पवारांनी बारामती लोकसभा मतदारसंघात एक भाषण केलं होतं. त्यावेळी त्यांनी उपस्थितांना संबोधित केलेल्या वक्तव्यावरून विरोधकांनी



टीका केली होती. तसेच आचारसंहितेचा भंग केल्याचा आरोप केला होता. या वक्तव्याला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून आक्षेप घेण्यात आला आणि निवडणूक आयोगाकडे त्याची तक्रार करण्यात आली होती. 'तुम्हाला पाहिजे तेवढा निधी आम्ही देऊ, पण आमच्यासाठी मशीनमध्ये कचाकच बटण दाबा.', असं विधान अजित पवार यांनी केलं होतं. त्यांच्या वक्तव्याचा व्हिडिओ देखील सोशल मीडियावर व्हायरल झाला होता.

निवडणूक आयोगाने या तक्रारीनंतर चौकशी केली तेव्हा प्राथमिक तपासात अजित पवारांनी केलेल्या वक्तव्यात कोणत्याही उमेदवाराचे नाव किंवा पक्षाचे नाव अजित पवारांकडून घेण्यात आले नाही. त्यामुळे हा आचारसंहितेचा भंग ठरत नाही, असं निवडणूक आयोगाने क्लीनचिट अहवालात नमूद केलं आहे.

## 'मला अडकवण्यासाठी नवीन पोलीस आयुक्त...'
### मविआ सरकारवर फडणवीसांचा गंभीर आरोप

■ नागपूर, नितीन देवळेकर : लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यात आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झाडताना दिसत आहेत. अशातच मंत्री चंद्रकांत पाटील यांनी माढ्यात बोलताना मविआच्या काळात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तुरुंगात टाकण्यात येणार होतं असा धक्कादायक दावा केला होता. या दाव्याला एका मुलाखतीदरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही दुजोरा दिला. या सगळ्या प्रकरणावर आता देवेंद्र फडणवीसांनी भाष्य केलं आहे.

मला अडवण्यासाठी पोलीस आयुक्तांना बसवलं होतं असे देवेंद्र फडणवीसांनी म्हटलं आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे



ईशान्य मुंबईचे उमेदवार मिहीर कोटेचा यांच्या प्रचार रॅलीमध्ये सहभागी झाले होते. त्यावेळी एका मराठी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत या सगळ्या प्रकरणाबाबत प्रतिक्रिया दिली.

महायुतीच्या काळात अनेक भाजपच्या नेत्यांना अटक करण्याचं षडयंत्र रचलं जात असल्याचे आरोप आता करण्यात येत आहेत. त्याबाबत बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाचे विधान केलं.

''महाविकास आघाडीने मला कोणत्यातरी प्रकरणात अडकवण्याचा खूप प्रयत्न केला. केसापासून नखापर्यंत माझी चौकशी केली पण त्यांना काहीच सापडलं नाही. खोट्या केसेस टाकण्यासाठी एक पोलीस आयुक्त आणून बसवला, पण इतर पोलीस अधिकाऱ्यांनी सहकार्य केलं नाही,'' असा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला.

''ठाकरे गट अहवाल काही देऊ शकतो. अमेरिकेचा अध्यक्षही त्यांचा होऊ शकतो असा अहवालही ते देऊ शकतात. पण आता वास्तविकता वेगळी असून आता आमच्यासोबत मनसे देखील आली आहे. त्यामुळे मला काहीच अडचण वाटत नाही,'' असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. ठाकरे गटाच्या जाहीरनाम्यावरही फडणवीसांनी प्रतिक्रिया दिली.

''उद्धव ठाकरेंनी आधी त्यांच्या अडीच वर्षांच्या कार्यकाळावर श्वेतपत्रिका काढावी. अडीच वर्षात महाराष्ट्राची किती अधोगती झाली यासाठी त्यांनी माफी मागावी. मुंबईला फसवण्याचे काम उद्धव ठाकरेंनी केलं. २५ वर्ष मुंबई त्यांच्याकडे होती. एक काम ते मुंबईतील दाखवू शकत नाहीत. आमच्याकडे सरकार आल्यानंतर आम्ही मुंबईचा कायापालट केला,'' असंही फडणवीसांनी म्हटलं

## दादोजी कोंडदेव स्टेडियममध्ये सापडले भंगारजमा ईव्हीएम मशीन... जितेंद्र आव्हाडांना वेगळीच शंका



■ ठाणे, रोहित जैसवाल : ठाण्यामध्ये भंगारात जमा झालेले ईव्हीएम मशीन (EVM Machine) वापरलं जात असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. जितेंद्र आव्हाड यांच्या आरोपाने एकच खळबळ उडाली आहे. ठाण्याच्या दादोजी कोंडदेव स्टेडियममध्ये सापडलेल्या भंगारजमा ईव्हीएम मशीन आणि मतदान कार्डचा व्हिडीओ सोशल मीडियावर त्यांनी पोस्ट केला आहे. या व्हिडीओच्या माध्यमातून त्यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे.

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी आज मतदान होत आहे. अशामध्ये जितेंद्र आव्हाड यांनी सोशल मीडियावर पोस्ट केलेल्या व्हिडीओमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. जितेंद्र आव्हाड यांनी आपल्या अधिकृत एक्स अकाऊंटवर ठाण्याच्या दादोजी कोंडदेव स्टेडिअममध्ये भंगारामध्ये जमा झालेले ईव्हीएम मशीन्स आणि हजारो मतदान कार्ड सापडल्याचा व्हिडीओ पोस्ट केला आहे. २०१४ पासून या वस्तू दादोजी कोंडदेव स्टेडिअमच्या स्टोअर रुममध्ये पडून असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

हा व्हिडीओ पोस्ट करत जितेंद्र आव्हाड यांनी ठाणे महानगर पालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत सडकून टीका केली आहे. हा व्हिडीओ पोस्ट करत त्यांनी कॅप्शनमध्ये लिहिले की, 'लोकशाहीचा खून का करताय? ठाण्यात काय चाललंय बघा.' जितेंद्र आव्हाड यांनी या पोस्टनंतर प्रतिक्रिया देत अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत.

जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले की, 'ईव्हीएम जेव्हा तुम्हाला जमा करायचे असतात. तेव्हा निवडणूक आयोगाकडे ईव्हीएमचा हिशोब असतो. मग हे ईव्हीएम आले कुठून? मतपत्रिका वाटण्यासाठी म्हणून महानगर पालिकेच्या अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना दिले जातात. या मतपत्रिका इथे ठेवल्या कशा गेल्या?', असा सवाल त्यांनी सरकारला केला आहे.

तसंच, 'ईव्हीएम हे मॅनेजमेंट आहे. आजही सुप्रीम कोटार्चा निकाल लागला आहे. सर्वोच्च न्यायालय हे सुप्रीम आहे. या निकालाने लोकशाहीचे भले होणार नाही. मी दिलेले मत कोणाला जाते हे मला कळाले पाहिजे.', असे म्हणत जितेंद्र आव्हाड यांनी सुप्रीम कोर्टाच्या निकालाने आम्ही खूश नसल्याचे मत व्यक्त केले.

त्याचसोबत, ' तुम्ही दिलेल्या ईव्हीएम मशीनची टोटल आली पाहिजे. तुम्ही निवडणूक आयोगाकडून किती ईव्हीएम मशीन घेतले आणि परत किती दिले याची सगळी टोटल मॅच झाली पाहिजे. हे सर्व संशयास्पद आहे. पण कोर्टाने त्याच्या बाजूने निकाल दिला आहे. त्यामुळे आता बोलायचे काय?', असं म्हणत जितेंद्र आव्हाड यांनी कोर्टाच्या निर्णयावर नाराजी व्यक्त केली आहे.

## आचारसंहितेत पोलीस, उत्पादन शुल्क विभागाकडून साडेपाच कोटीचा मद्यसाठा, अमली पदार्थ जप्त

■ नाशिक, दिगंबर जाधव : लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यापासून जिल्ह्यात पोलीस, उत्पादन शुल्क विभागाने सुमारे साडेपाच कोटींचा अवैध मद्यसाठा, अमली पदार्थ आणि अन्य सामग्री जप्त करण्यात आली आहे. यात दोन कोटी ४५ लाखाची दारु तर २४ लाख ५४ हजार रुपयांच्या अमली पदार्थांचा समावेश आहे.

निवडणूक काळात मतदारांना प्रलोभन दाखविण्यासाठी विविध मार्गांचा अवलंब केला जातो. या काळात मद्याचा महापूर वाहत असल्याचा अनुभव आहे. या पार्श्वभूमीवर, मद्याची अवैध वाहतूक व अमली पदार्थ विक्रीवर यंत्रणांकडून काटेकोरपणे लक्ष दिले जात आहे.



लोकसभा निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर १६ मार्च रोजी आचारसंहिता लागू झाली. तेव्हापासून आतापर्यंत विविध यंत्रणांनी केलेल्या कारवाईची माहिती जिल्हा निवडणूक शाखेने अहवालातून दिली आहे. त्यानुसार या काळात एक कोटी ७१ हजार ६६३ लिटर मद्यसाठा जप्त करण्यात आला. त्याची किंमत सुमारे अडीच कोटीच्या घरात आहे.

इगतपुरी तालुक्यात मोठ्या प्रमाणात मद्यसाठा पकडण्यात आला. नाशिक पश्चिम व नाशिक मध्य विधानसभा क्षेत्रात हे प्रमाण सर्वात कमी आहे. त्याचवेळी एक लाख १७ हजार ग्रॅम विविध प्रकारचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले. त्याची किंमत २५ लाखाच्या आसपास आहे. याच काळात दोन कोटी ७१ लाख रुपये किंमतीची अन्य सामग्री जप्त करण्यात आली. आचारसंहिता लागू झाल्यापासून पाच कोटी ४१ लाख रुपयांचा अवैध मद्य व अमली पदार्थांचा साठा जप्त करण्यात आल्याची माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे यांनी दिली.

## सीवूड्स येथील तांडेल मैदान चौकात अपघातापासून बचावासाठी महापालिका करणार चौकाचे काँक्रीटीकरण

■ नवी मुंबई, भावना जैन: करावे गावच्या तलावाशेजारीच विस्तीर्ण गणपतशेठ तांडेल मैदानालगतचा चौक वाहनांच्या वर्दळीमुळे व पाच रस्ते एकत्र आल्यामुळे धोकादायक असून येथे सातत्याने छोटे मोठे अपघात होतात. त्यामुळे चौकात वाहकूक बेट तयार करून काँक्रीटीकरण काम केले जात आहे.

या ठिकाणी सततच्या होणाऱ्या अपघातामुळे या चौकाबाबत नवी मुंबई महापालिकेने योग्य ती उपाययोजना करण्याची मागणी




स्थानिक नागरिक तसेच या मैदानात जॉगिंगसाठी येणारे नागरीक यांनी सातत्याने केली होती. गणपतशेठ तांडेल चौकात करावे गाव व तलावाच्या दिशेने एक तसेच सीवूड्स डी मार्टच्या दिशेने तसेच सीवूड्स रेल्वेस्थानक दिशेने व पामबीच मार्गाने या चौकात एकत्र वाहने मोठ्या संख्येने येत असतात.

चौकात वाहतूक बेट व सिग्नल व्यवस्था नसल्याने सातत्याने अपघात होत आहेत. तसेच या चौकांच्या कोणत्याच मार्गावर गतिरोधकही नसल्याने दुचाकी तसेच चारचाकी वेगाने आल्याने अपघात घडतात. याच भागातून ज्वेल ऑफ नवी मुंबई परिसरात जाण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांची संख्याही मोठी असते. त्यामुळे या भागात पालिकेने काँक्रीटीकरण तसेच वाहतूक बेट उभारणीच्या कामाला सुरुवात केली आहे. त्यासाठी २ कोटी ७७ लाख रुपयांचा खर्च केला जाणार आहे.

# पनीर कटलेट

**साहित्य :** २०० ग्रॅम पनीर कुस्करून, २ मध्यम आकाराचे कांदे चिरून, १ गाजर किसून, १ वाटी बारीक चिरलेला कोबी, २ बटाटे उकडून कुस्करून, १ चमचा आले-लसूण पेस्ट, १ चमचा मिरची-कोथिंबीर पेस्ट, २ मोठे चमचे कॉर्नफ्लॉवर, गरजेनुसार मिठ, पाव ते अर्धा वाटी तेल, चाट मसाला.

**कृती :** भांड्यात तेल गरम करून त्यावर चिरलेला कांदा घाला. कांदा गुलाबी रंग येईपर्यंत शिजला की त्यावर



आले-लसूण पेस्ट व मिरची-कोथिंबीर पेस्ट घालून ढवळा. वरील मिश्रणावर कोबी, गाजर घालून २-३ मिनिटेच परतवत शिजवा. चायनीज पदार्थांसारखेच जास्त शिजू देऊ नका. आता कुस्करलेले बटाटे, मिठ घालून पुन्हा चांगले ढवळून लगेच गॅस बंद करा. हे मिश्रण एका ताटात पसरवा व जरा थंड होऊ द्या. मिश्रण थंड झाले की त्यात पनीर व कॉर्नफ्लॉवर टाकून मिश्रण एकजीव करा. आता तुम्हाला हव्या त्या आकाराचे कटलेट करा. व नॉनस्टिक पॅनवर जरासेच तेल घालून शॅलो फ्राय करून घ्या. दोन्ही बाजू मध्यम आचेवर साधारण ५-६ मिनिटे शिजवा. कटलेट तयार झाले की गरम असतानाच त्यावर चाट मसाला टाका. नुसते किंवा सॉस किंवा पुदिना चटणीबरोबर याचा आस्वाद घ्या.

**अधिक टिप :**

- **या कटलेटमध्ये इतर कोणतेही मसाले न वापरल्याने पनीर व भाज्यांचा अस्सल स्वाद येतो.**
- **लहान मुलांना तर खूपच आवडतात. शिवाय कोबीसारखी भाजी खाल्ली जाते.**
- **यात अजून कांद्याची पात, किंवा आपल्या आवडीच्या भाज्या थोड्या प्रमाणावर घालू शकता.**

# न्यूड मेकअप लूकसाठी काही टिप्स



**न्यूड मेकअप लूकचा सध्या खूपच वापर केला जातो. यासाठी ब्लॅक मस्कराचा वापर करा. आपल्याला त्वचेला सूट होईल असा नैसर्गिक रंग आणि गुलाबी रंगाच्या लिप कलरचा वापर करा. आकर्षक दिसण्यासाठी न्यूड मेकअप लूकसाठी कोणत्या टिप्सचा वापर केला पाहिजे, ते जाणून घ्या.**

- आपल्या डोळ्यांना नॅचरल लूक देण्यासाठी पापण्यांना ब्लॅक मस्करा लावा आणि केस कुरळे करा.
- डोळ्यावरच्या आतील कोपऱ्यापर्यंत काजळ लावा. त्यामुळे पापण्या सुंदर आणि आकर्षक दिसतील.
- गालावर नॅचरल चमक येण्यासाठी चीकबोन्सला हायलाइट करा. सध्या न्यूड मेकअप लूकसाठी आपल्या त्वचेला सूट होईल अशा नॅचरल शेडची निवड करा.
- यासाठी हलक्या रंगाचा वापर करा. चेहरा चमकण्यासाठी ओठांना हलक्या गुलाबी रंगाची पिंक शेडची लिपस्टिक लावून त्यावर शाईन येण्यासाठी लिप ग्लॉसचा वापर करा. त्यामुळे अजूनच आकर्षक लूक येईल.
- न्यूड मेकअप लूकसाठी एकाच रंगाच्या वेगवेगळ्या शेड्सचा वापर करा.
- न्यूड शेड्स लावण्याआधी लाईट बेस लावा आणि आवश्यक असल्यास हलक्या हातांनी लूज पावडर किंवा कॉम्पॅक्ट पावडर लावा.

# गरम पाणी पिण्याचे फायदे

**बहुतेक लोक आपल्या दिवसाची सुरुवात चहा किंवा कॉफीच्या गरमागरम कपाने करत असतात. काही लोकांना तर सकाळी उठल्या उठल्या चहा किंवा कॉफी मिळाली नाही, तर त्यांचा अख्खा दिवस वाईट जातो, इतकी त्यांना चहा किंवा कॉफीची सवय झालेली असते. पण या सवयीमुळे कालांतराने बद्धकोष्ठ, पोटदुखी, ॲसिडिटी, पिंपल्स अशा तक्रारी सुरू होतात. असे म्हटले जाते की त्वचा, केस आणि एकंदर शरीराचे आरोग्य सांभाळण्यासाठी भरपूर पाणी पिणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सकाळी उठल्या उठल्या एक ग्लास गरम पाणी पिण्याची सवयही तुमच्या शरीरातील अनेक विकार मुळापासून दूर करू शकते.**

**सकाळी** उठून नियमितपणे एक ग्लास गरम पाणी प्यायल्याने पचन शक्ती चांगली राहते. तसेच गरम पाणी प्यायल्याने शरीरातील रक्ताभिसरणही चांगले राहते. आपल्या खाण्या-पिण्याच्या अयोग्य सवयींमुळे आपल्या शरीरामध्ये साठत असलेले घातक पदार्थ गरम पाण्याच्या सेवनामुळे बाहेर टाकण्यास मदत होते. तसेच गरम पाण्याच्या नियमित सेवनामुळे शरीरातील अतिरिक्त चरबी घटण्यास मदत होऊन वजन कमी होण्यास मदत होते. योगशास्त्राच्या नियमानुसार तीन महिने गरम पाण्याच्या सेवनाने वजन कमी होऊ शकते. याकरिता इतर कोणतीही विशेष पथ्ये पाळण्याची गरज नाही.

काही लोकांना बद्धकोष्ठाचा त्रास होतो. अशा वेळी सकाळी रिकाम्यापोटी गरम पाणी पिणे फायदेशीर ठरू शकते. पुष्कळ महिलांना मासिक धर्माच्या दिवसांमध्ये डोकेदुखी सतावते. त्यावेळी नियमित गरम पाण्याचे सेवन केल्याने डोकेदुखीपासून आराम मिळतो. तसेच या



दिवसांमध्ये होणारी पोटदुखी ही गरम पाण्याच्या सेवनामुळे कमी होते.

दररोज सकाळी एक ग्लास गरम पाण्यामध्ये थोडासा लिंबाचा रस घालून प्यायल्याने शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढते. ज्यांना सतत बारीकसारीक तब्येतीच्या तक्रारी जाणवत असतील त्यांनी गरम पाणी आणि लिंबाच्या रसाचे दररोज सेवन करणे उत्तम. यामुळे त्वचेचे आरोग्य देखील चांगले राहून, त्वचेवर पिंपल्स येणे कमी होते. तसेच गरम पाण्याच्या सेवनाने ॲसिडिटीचा त्रासही कमी होतो. पुष्कळ लोकांच्या खाण्या-पिण्याचे वेळापत्रक किंवा झोपेच्या वेळा अतिशय अनियमित असतात. शिवाय ज्या लोकांना काही ना काही कारणाने सतत प्रवास करावा लागतो. त्यांनाही बाहेरच्या जेवणावरच काम चालवून घ्यावे लागते. परिणामी ॲसिडिटीसारखे विकार पाठीमागे लागतात. अशा वेळी दररोज सकाळी गरम पाणी पिण्याच्या सवयीने ॲसिडिटीचे प्रमाण कमी होते.

# कोरफडीचे ५ गुणकारी फायदे

**कोरफड त्वचेसाठी खूप फायदेशीर आहे. याच्या नियमित सेवनाने त्वचेसंबंधित अनेक समस्या दूर होतात. जाणून घ्या कोरफडीचे गुणकारी फायदे...**

- सतत कॉम्प्युटरसमोर बसल्याने डोळ्यांवर ताण येतो. डोळ्यांचे आरोग्य चांगले राहाण्यासाठी दोन चमचे कोरफडीचा गर एक कप पाण्यात मिसळून त्याने डोळे धुवा. यामुळे डोळ्यांना आराम मिळेल.
- चेहऱ्यावर पुटकुळ्या आल्यास कोरफडीचा गर चेहऱ्यावर लावा. थोड्या वेळाने चेहरा साध्या पाण्याने धुवा. यामुळे पुटकुळ्या कमी होतील.
- शरीरावर कापल्यामुळे जखम झाली असल्यास त्यावर कोरफडीचा गर लावा.
- कोंड्याची समस्या असल्यास दोन चमचे कोरफडीचा गर कंडिशनरसोबत मिसळा. यामुळे कोंड्यापासून सुटका होईल.
- दातांच्या हिरड्या मजबूत करण्यासाठी हिरड्यांवर कोरफडीचा गर लावा.

# मासिक पाळी पुढे ढकलताय?

**सण, समारंभ, पर्यटन किंवा धार्मिक कार्याच्या आड येणारी मासिक पाळी पुढे ढकलण्याचा निर्णय अनेक महिला घेतात. मात्र अशा प्रकारे निसर्गचक्रात हस्तक्षेप करणं चुकीचं आहे. बरंच प्रबोधन होऊनही मासिक पाळीबाबतचे गैरसमज कमी झालेले नाहीत. म्हणूनच महिलांना कृत्रिम पद्धतीने पाळी पुढे ढकलावी लागते. मासिक पाळी पुढे ढकलण्यासाठी गोळ्या घेतल्या जातात. पण या गोळ्यांचे शरीरावर दीर्घकालीन परिणाम होतात.**

- मासिक पाळी पुढे ढकलणाऱ्या गोळ्यांच्या सततच्या सेवनामुळे यासंदर्भातल्या नैसर्गिक चक्रावर परिणाम होऊ शकतो. शिवाय महिलांच्या प्रजननक्षमतेवरही याचे घातक परिणाम दिसून येतात.
- या गोळ्यांचं सेवन केल्यानंतर पुढचा काही काळ मासिक पाळीदरम्यान मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव होण्याची शक्यता वाढते. जवळपास २० टक्के महिलांना हा अनुभव येतो. पुढचे काही महिने मासिक पाळीतून अधिक प्रमाणात रक्त जाऊ शकतं.
- या गोळ्या बऱ्याच काळपर्यंत घेत राहिल्यास आरोग्यावर अत्यंत घातक असे परिणाम दिसून येतात. नसांमध्ये रक्ताची गुठळी होण्यासारख्या समस्या जाणवू शकतात. या गोळ्यांमुळे इतर औषधांच्या शरीरावरच्या प्रभावावर विपरित परिणाम होऊ शकतो.
- या गोळ्या घेतल्यानंतर इतर काही दुष्परिणाम होऊ शकतात. जुलाब, हातापायांमध्ये गोळे येणं, अवेळी रक्तस्राव होणं हे दुष्परिणाम दिसून येऊ शकतात.



# जाणून घ्या टिकली लावल्याने होणारे फायदे



**टिकलीचाही महिलांच्या १६ शृंगारांमध्ये समावेश असून सौभाग्यवती महिला काही वर्षांपूर्वी कुंकवाचा वापर करत असत. पण कुंकवाचा वापर न करता टिकलीचा वापर सध्या महिलावर्ग मोठ्या प्रमाणात करताना पाहायला मिळतात. महिला चेहऱ्यावर लावण्यात आलेल्या टिकलीमुळे केवळ सुंदरच दिसत नाहीत तर त्याचे अनेक आरोग्यदायी फायदेही आहेत. टिकलीचा वापर सामान्यतः महिला ट्रेडिशनल लूकसाठी करतात. पण एका अभ्यासानुसार आरोग्यालाही टिकलीमुळे अनेक फायदे होतात. यामुळेच टिकलीचा वापर अनेक महिला करत आहेत. एवढेच नाही तर वेस्टर्न कपडे परिधान करणाऱ्या महिलाही आपल्या ड्रेसनुसार कलरफुल टिकली वापरण्यास सुरुवात करत आहेत. चेहऱ्यावरील टिकलीमुळे महिला खुपच सुंदर दिसतात आणि त्यामुळे अनेक आरोग्यदायी फायदेही होतात. कपाळावर टिकली लावण्याने अनेक फायदे होतात.**

**कपाळावर** टिकली लावल्यामुळे डोके दुखणे बंद होते. ॲक्युप्रेशर शास्त्रानुसार कपाळावर ज्या ठिकाणी टिकली लावण्यात येते, त्या जागेवर मसाज केल्यास डोकेदुखी तत्काळ बंद होते. टिकली लावलेल्या जागेवर मसाज केल्यास नाकाच्या आसपास ब्लड सर्क्युलेशन चांगल्या पद्धतीने होण्यास सुरुवात होते, ज्यामुळे तुम्हाला खूपच आराम मिळतो.

टिकली दोन्ही भुवयांच्या मध्यभागी ज्या ठिकाणी लावली जाते, शरीरातील सर्व नसा त्याच केंद्रावर एकत्र येतात. टिकली लावण्यात येणाऱ्या या जागेला अग्निचक्र या नावाने सुद्धा ओळखले जाते. म्हणूनच टिकली लावल्याने एकाग्रताही वाढते आणि मन शांत राहते. तसेच, टिकली लावल्याने ताणतणावही कमी होतो.

तुम्हाला पूर्ण झोप मिळत नाही आणि त्यामुळे तुम्ही त्रस्त आहात तर टिकली लावणे तुमच्यासाठी खूपच फायदेशीर होऊ शकते. टिकली शरीरच्या वरच्या भागाला शांत ठेवण्यासाठी खूपच फायदेशीर ठरते. कपाळावर टिकली लावल्याने चांगली झोप येते.

टिकली डोळ्यांच्या नसा मजबूत करण्यास खूपच मदत करते. टिकली कपाळ्याच्या मध्यभागी ज्या ठिकाणी लावली जाते, त्या ठिकाणच्या नसा आणि डोळ्यांमधील नसा यांच्यात एक कनेक्शन असते. टिकली डोळ्यांच्या नसांना मजबूत करण्यास मदत करते ज्यामुळे तुम्हाला एकदम स्पष्ट आणि साफ दिसण्यास मदत होते. एवढेच नाही तर टिकली लावल्याने आसपासचे मसल्स मजबूत आणि हेल्दी होतात.



तुमच्या चेहऱ्यावर जर सुरकुत्या पडण्यास सुरुवात होत आहे तर टिकली लावण्यास तुम्ही सुरुवात करा. कारण, टिकली लावल्याने चेहऱ्यावर येणाऱ्या सुरकुत्यांपासून सुटका मिळण्यास मदत होते.

# चीनमध्ये घुमला 'जय महाराष्ट्र'चा नारा! प्रवीण तरडेंनी शांघायमधून शेअर केला व्हिडीओ




मराठी कलाविश्वातील लोकप्रिय दिग्दर्शक म्हणून प्रवीण तरडे यांना ओळखलं जातं. मराठीसह हिंदी कलाविश्वात त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. सोशल मीडियावर ते विविध विषयांवरील व्हिडीओ शेअर करत असतात. प्रवीण तरडे एका कार्यक्रमासाठी नुकतेच चीनमध्ये गेले होते. यासंदभार्तील व्हिडीओ त्यांनी नुकताच फेसबुकवर शेअर केला आहे.

चीनच्या शांघाय शहरात 'चायनाप्लास २०२४' हे जगातील सर्वात मोठं प्लास्टिक उद्योगातील प्रदर्शन भरतं. याला नुकतीच प्रवीण तरडेंनी भेट दिली. यंदा या प्रदर्शनाला महाराष्ट्रातून पाच हजार उद्योजकांनी हजेरी लावल्याचं प्रवीण तरडेंनी त्यांच्या व्हिडीओमध्ये सांगितलं आहे.

प्रवीण तरडे सांगतात, ''नमस्कार मंडळी आज आपण चायनामध्ये आलोय. चीनमध्ये जगातील सर्वात मोठं प्लास्टिक उद्योगातील प्रदर्शन भरलंय. याला 'चायनाप्लास २०२४' असं देखील म्हणतात. दर तीन वर्षांनी हे प्रदर्शन भरतं आणि अनेक नामवंत मंडळी येथे येतात. सर्वात आनंदाची गोष्ट म्हणजे या एवढ्या मोठ्या कार्यक्रमात आपला मराठी झेंडा सुद्धा आहे. महाराष्ट्रातून देखील उद्योजक याठिकाणी आले आहेत.''

''चायनाच्या शांघाय शहरात हा मराठी माणसाचा झेंडा पाहून खूप छान वाटतं. हे सगळे उद्योजक आता नवीन तंत्रज्ञान घेऊन महाराष्ट्रात येणार आहेत. जे लोक म्हणतात ना...मराठी माणूस व्यवसाय करत नाही फक्त नोकरी करतो. त्यांना माझं एकच सांगणं आहे की, हे फक्त या व्हिडीओमध्ये आहेत. याठिकाणी महाराष्ट्रातून जवळपास ४ ते ५ हजार लोक आले आहेत. फक्त पुणे जिल्ह्यातून पाचशे उद्योजक आले आहेत. या सगळ्यांना माझ्या खूप शुभेच्छा! मराठी माणूस प्रत्येक क्षेत्रात पाय रोवून उभा आहे. असाच आपला झेंडा कायम फडकवत ठेवा जय महाराष्ट्र!'' असं प्रवीण तरडेंनी या व्हिडीओमध्ये सांगितलं.

दरम्यान, प्रवीण तरडेंनी शेअर केलेल्या पोस्टवर नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. दिग्दर्शकाने या व्हिडीओमध्ये प्रत्येक मराठी उद्योजकाची ओळख करून दिली. तसेच भारतात आल्यावर यांना प्रोत्साहन देऊन पाठिंबा द्या असंही त्यांनी चाहत्यांना सांगितलं आहे.

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ६७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | | 2 | 9 | | 5 | | 1 | 6 |
| 9 | | | | | | 3 | | |
| 5 | | | | 6 | 8 | 9 | | |
| 2 | | 6 | 4 | | | | | 1 |
| | 9 | | | | 3 | 2 | | 8 |
| | 5 | 3 | 6 | | | | 4 | |
| | | | 1 | | | | | |
| | 2 | | 8 | 3 | | | | 5 |
| | 1 | | | 2 | 6 | | | |

## उत्तर सुडोकू -६६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 7 | 1 | 4 | 9 | 8 | 3 | 6 | 2 |
| 6 | 8 | 3 | 1 | 2 | 5 | 9 | 7 | 4 |
| 2 | 4 | 9 | 3 | 6 | 7 | 8 | 1 | 5 |
| 3 | 5 | 7 | 2 | 4 | 9 | 6 | 8 | 1 |
| 8 | 2 | 6 | 5 | 1 | 3 | 7 | 4 | 9 |
| 9 | 1 | 4 | 7 | 8 | 6 | 2 | 5 | 3 |
| 7 | 9 | 5 | 6 | 3 | 1 | 4 | 2 | 8 |
| 1 | 3 | 2 | 8 | 7 | 4 | 5 | 9 | 6 |
| 4 | 6 | 8 | 9 | 5 | 2 | 1 | 3 | 7 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

# विशेष मुलांसाठी, पालकांसाठी 'मायलेक'चे स्पेशल स्क्रिनिंग




ह्यमायलेकह्न चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला असून या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगलाच प्रतिसाद मिळतोय. आई आणि मुलीच्या नात्यावर भाष्य करणारा हा चित्रपट आहे. गाणीही सध्या ट्रेण्डिंगमध्ये असून त्यावर ह्यमायलेकींह्नचे रिल्सही झळकत आहेत. चित्रपट पाहाताना अनेकांच्या डोळ्यांच्या कडा पाणवत आहेत. चित्रपटाची कथा, अभिनय सगळ्यांचेच कौतुक होत आहे. दरम्यान, सोनाली खरे आणि ह्यसोसायटी फॉर दि एज्युकेशन ऑफ दि चॅलेन्जेडह्न या संस्थेने या विशेष मुलांसाठी ह्यमायलेकह्नच्या स्पेशल स्क्रिनिंगचे आयोजन केले होते. यावेळी अनेक पाल्य- पालकांनी, संस्थेतील शिक्षकांनी हा चित्रपट एन्जॉय केला.

याबद्दल सोनाली खरे म्हणते, ह्यप्रत्येक आईला आपली मुले प्रिय असतात आणि प्रत्येक मुलाचे आपल्या आईवर प्रेम असते. आज इथे जमलेल्या पाल्य- पालकांना बघून खूप छान वाटले. त्यांनी हा चित्रपट आवडीने पाहिला, त्यावर प्रतिक्रिया दिल्या, हीच आमच्यासाठी मोठी गोष्ट आहे. ह्यसोसायटी फॉर दि एज्युकेशन ऑफ दि चॅलेन्जेडह्न या संस्थेचेही मी आभार मानते, कारण त्यांच्या सहकार्यामुळेच हे शक्य झाले.ह्न

या चित्रपटात सोनाली खरे, सनाया आनंद, उमेश कामत, शुभांगी लाटकर, संजय मोने, बिजय आनंद यांच्या प्रमुख भूमिका आहेत. ब्लुमिंग लोटस प्रोडक्शन्स, सोनाली सराओगी प्रस्तुत, सोनाली आनंद निर्मित, प्रियांका तन्वर दिग्दर्शित आहे. कल्पिता खरे, बिजय आनंद या चित्रपटाचे सहनिमार्ते असून नितीन प्रकाश वैद्य ह्यमायलेकह्नचे असोसिएट प्रोड्यूसर आहेत.

या चित्रपटात तीन पिढ्या आपल्याला पाहायला मिळाली आहे. एक म्हणजे सोनाली खरे आणि सनाया आनंद. दुसरी मायलेकीची जोडी म्हणजे सोनाली खरे आणि तिची आई कल्पिता खरे. या तिघींना एकाच चित्रपटात पाहून सगळ्यांनाच आनंद झाला आहे.

## दिनविशेष

### २७ एप्रिल

- १८५४: पुण्याहून मुंबईला तारायंत्राद्वारे पहिला संदेश पाठविला गेला.
- १९०८: चौथ्या ऑलिम्पिक खेळांना लंडन येथे सुरुवात झाली.
- १९४१: दुसरे महायुद्ध झ्र जर्मन फौजांनी अथेन्समधे प्रवेश केला.
- १९६१: सिएरा लिओनला ग्रेट ब्रिटनकडून स्वातंत्र्य मिळाले.
- १९७४: राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांच्यावर कारवाई करावी या मागणीसाठी अमेरिकेतील वॉशिंग्टन येथे १०,००० लोकांनी निदर्शने केली.
- १९९२: बॅटी बूथरायड ह्या ब्रिटिश हाऊस ऑफ कॉमन्सच्या लोकप्रतिनिधी निवडून येणारया पहिल्या महिला ठरल्या.
- १९९९: एकाच अग्निबाणाद्वारे एकापेक्षा अधिक उपग्रह प्रक्षेपित करण्याची प्रणाली भारतात तयार झाली.
- २००५: एअरबस ए-३८० जातीच्या विमानाचे प्रथम प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.
- २०११: अमेरिकेच्या दक्षिण भागात टोर्नॅडोंचा उद्रेक त्यात ३०० ठार झाले.
- १७९१: मोर्स कोड व तारायंत्राचे जनक आणि चित्रकार सॅम्युअल मोर्स यांचा जन्म. (मृत्यू: २ एप्रिल १८७२)
- १८२२: अमेरिकेचे १८ वे राष्ट्राध्यक्ष युलिसीस एस. ग्रॅन्ट यांचा जन्म. (मृत्यू: २३ जुलै १८८५)
- १८८३: नाटककार भार्गवराम विठ्ठल वरेरकर उर्फ मामा वरेरकर यांचा जन्म. (मृत्यू: २३ सप्टेंबर १९६४)
- १९१२: भारतीय अभिनेत्री, नृत्यांगना, आणि कोरिओग्राफर जोहरा सेहगल यांचा जन्म. (मृत्यू: १० जुलै २०१४)
- १९२०: महात्मा गांधींचे अनुयायी डॉ. मणिभाई भीमभाई देसाई यांचा जन्म. (मृत्यू: १४ नोव्हेंबर १९९३)
- १९२७: मार्टिन ल्युथर किंग यांची पत्नी कोरेटा स्कॉट किंग यांचा जन्म.
- १९७६: पटकथालेखक भारतीय दिग्दर्शक फैसल सैफ यांचा जन्म.
- १५२१: पोतुर्गीज शोधक फर्डिनांड मॅगेलन यांचे निधन.
- १९८०: पद्मश्री सहकारमहर्षी विठ्ठलराव एकनाथराव विखे पाटील यांचे निधन. (जन्म: २९ ऑगस्ट १९०१)
- १८८२: अमेरिकन लेखक व तत्वज्ञ राल्फ वाल्डो इमर्सन यांचे निधन. (जन्म: २५ मे १८०३)

## भविष्य

**मेष** दूरच्या प्रवासाचा योग येईल. जास्त धाडस करू नका. व्यावसायिक प्रगतीचे दर उघडेल. सर्वांशी गोडीगुलाबीने वागाल.

**वृषभ** व्यावसायिक बदलाचे वारे मनात वाहू लागतील. कामाच्या ठिकाणी तुमचे वर्चस्व वाढेल. मुलांकडून चांगल्या बातम्या मिळतील.

**मिथुन** मनातील आकांक्षा विनासायास पूर्ण होतील. तरुण वर्गाने कसलीही घाई करू नये. मुलांकडून शुभ वार्ता मिळतील. योग्य ठिकाणी गुंतवणूक करावी.

**कर्क** महत्त्वाच्या कागदपत्रांची काळजी घ्यावी. वरिष्ठांना नाराज करू नका. धार्मिक कार्याचा लाभ घ्यावा. भावंडांची काळजी लागून राहील. कलाकारांना प्रसिद्धी मिळेल.

**सिंह** तुमचा मनमोकळा स्वभाव इतरांच्या नजरेत भरेल. वरिष्ठांच्या शाबासकीस पात्र व्हावे. प्रेमप्रकरणातील जवळीक त्रासदायक ठरू शकते. कौटुंबिक स्वास्थ्य जपावे.

**कन्या** मुलांचा व्रात्यपणा वाढू शकतो. कामात चिकाटी ठेवावी लागेल. जोडीदाराची प्राप्ती वाढेल. जुन्या कामातून लाभ संभवतो. अति अपेक्षा बाळगू नका.

**तुला** हाती सोपवलेले काम वेळेत तडीस न्याल. कामात कसलीही घाई उपयोगाची नाही. डोके ठिकाणावर ठेवून वागावे. कौटुंबिक बाजू ध्यानात घेऊन वागावे. घेतलेल्या कष्टाचे चीज होईल.

**वृश्चिक** जोडीदाराशी अनबन टाळावी. स्वकष्टाने आर्थिक बाजू सुधाराल. आपल्या वागण्याने कोणी दुखवणार नाही याची काळजी घ्यावी. सत्य-असत्याची खातरजमा करावी.

**धनु** बाह्यरुपावर भुलू नका. काटकसरीचा मार्ग अवलंबाल. नवीन आव्हानाला सामोरे जाल. तुमची काम करण्याची शक्ति वाढेल. तुमचा आत्मविश्वास वाढीस लागेल.

**मकर** सर्वांशी मधुर वाणीने बोलाल. कौटुंबिक जबाबदारी वाढू शकते. तुमच्या संभाषणाची उत्तम छाप पडेल. कामात अधिक उत्साह येईल. तुमची महत्त्वाकांक्षा वाढीस लागेल.

**कुंभ** व्यवहारी बुद्धिमत्ता वापराल. काही गोष्टींचे धोरण ठरवावे लागेल. सामाजिक गोष्टींची जाणीव ठेवावी. गुरूजनांचा आशीर्वाद लाभेल. तुमची मानमान्यता वाढेल. फसवणुकीपासून सावध राहावे.

**मीन** नैराश्याला बळी पडू नका. फसवणुकीपासून सावध राहावे. मैत्रीचे नाते जपावे. जमिनीच्या कामास गतीमानता येईल. अति श्रमाचा थकवा जाणवेल. जवळचा प्रवास घडेल. जोडीदाराविषयी मतभेद संभवतात.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# मतमतांचे भोवरे

देशासमोरील ज्वलंत प्रश्नांऐवजी भावनिक मुद्द्यांना हात घालून मतदारांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न ध्रुवीकरणाच्या दिशेने नेणारा आहे. सर्वसामान्य लोकांच्या ज्वलंत प्रश्नांवर आणि देशापुढील, विविध राज्यांपुढील समस्यांवर मंथन होऊन लोकसभा निवडणुकीत काही महत्त्वाचे प्रश्न ऐरणीवर येतील, ही अपेक्षा पुन्हा फोल ठरताना दिसत आहे. खरे तर देशाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची अशी निवडणूक असतानाही प्रचारातील चर्चेची गाडी भावनिकता, अस्मिताबाजी, ध्रुवीकरण यांच्याच मार्गाने चाललेली असून ती योग्य मार्गावर आणण्यासाठी कोणाला साकडे घालावे, असा प्रश्न आहे. याचे कारण वरिष्ठ नेतेमंडळीच या धुळवडीत भाग घेत आहेत. त्यात पंतप्रधान पदावरील नरेंद्र मोदी हेही सहभागी आहेत. अशावेळी प्रचाराचा स्तर खालावला नाही तरच नवल. दीर्घकाळ प्रस्थापित असलेल्या काँग्रेसला सत्तेवरून दूर करून आपले बस्तान बसवणे ही अर्थातच सोपी गोष्ट नव्हती, त्यामुळे २०१४च्या निवडणुकीतील आक्रमक आणि भडक प्रचाराची रणनीती काही प्रमाणात समजून घेता येते. पण दहा वर्षे सत्ता उपभोगल्यानंतरही जर तेच युक्तिवाद आणि तोच आरोप-प्रत्यारोपांचा खेळ खेळला जात असेल तर गेल्या दहा वर्षांत या लोकशाही देशाने प्रगती केली म्हणजे नेमके काय केले, असा प्रश्न पडतो. मोदींच्या भाषणांमधून मासे आणि मटणावरून शेरेबाजी झाली, काँग्रेसवर मुस्लिमधार्जिणेपणाच्या आरोपाचा पाढा वाचून झाला. हे कमी म्हणूनच की, काय मंगळसूत्राचीही उठाठेव केली गेली. धार्मिक ध्रुवीकरणाशिवाय निवडणुका लढवता येत नाहीत आणि देशाचे शीर्षस्थ नेतृत्व दरवेळी त्याचाच आधार घेते, हे दुर्दैवी वास्तव आहे. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या काळातील भ्रष्टाचारविरोधी असंतोषावर स्वार होऊन मोदींच्या नेतृत्वाखालील सरकार २०१४ मध्ये सत्तेवर आले. शंभर दिवसांत कायापालट घडवण्याची ग्वाही देणारे मोदी दहा वर्षांनंतरही पुन्हा संधी मागत आहेत आणि ती मागताना आपल्या कामगिरीचा दाखला देण्याऐवजी धार्मिक ध्रुवीकरणाचा आधार घेत आहेत. निवडणूक हा अलीकडच्या काळात जात आणि धर्माचा खेळ बनला आहे. उमेदवारी वाटपापासून जात आणि धर्म सर्वच पक्षांच्या केंद्रस्थानी असतात, हे वास्तव आहे. ते बदलण्याचा कोणीही गांभीर्याने आणि प्रामाणिकपणे प्रयत्न करताना दिसत नाही. बिहारचे माजी उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनी चैत्री नवरात्राच्या पहिल्या दिवशी मासे खात असतानाचा व्हिडिओ टाकला. त्याची अपेक्षेप्रमाणे प्रतिक्रिया आल्यावर, ''भाजपच्या बुद्धयांकाची चाचणी करण्यासाठी आपण हा व्हिडिओ टाकला'', असे त्यांनी सांगितले. या व्हिडिओवर बिहार भाजपच्या स्थानिक नेत्यांच्या प्रतिक्रिया आल्या; परंतु मोदी यांनीही, श्रावणात मटण खाता, नवरात्रात मासे खाता, लोकांच्या भावनांशी खेळता, ही 'मुगलिया सोच'असल्याची टीका केली. लोकांच्या खाण्यापिण्यावर निर्बंध आणण्याचे भाजपचे प्रयत्न असल्याची टीका त्यावर विरोधकांनी केली. मासे आणि मटणाचा हा विषय मागे पडतानाच राजस्थानातील बांसवाडा येथील सभेत नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसच्या जाहीरनाम्यातील संपत्तीच्या फेरवाटपाच्या मुद्याचा आधार घेऊन, केंद्रात काँग्रेसची सत्ता आली तर जास्त मुले असलेल्या 'घुसखोरां'ना संपत्तीचे फेरवाटप होईल; तसेच तुमच्याकडील सोने,दागदागिने काढून घेताना मंगळसूत्रेही हिरावून घेतली जातील, असे विधान केले. निवडणुकीच्या मैदानात उतरल्यावर कसलाही विधिनिषेध ठेवायचा नाही, असा या नेत्यांनी पण केला आहे की काय, असे वाटते. डॉ. मनमोहन सिंग यांच्या २००६मधील, म्हणजे अठरा वर्षांपूर्वीच्या भाषणातील विधानांचा मोडकातोडका संदर्भ घेऊन मोदींनी आपला अजेंडा रेटण्याचा प्रयत्न केला. इथे केवळ त्यांनी धार्मिक ध्रुवीकरणाचाच प्रयत्न केलेला नाही, तर महिलांच्या मनात भीतीही पेरण्याचा प्रयत्न केला. काँग्रेसने त्याबाबत निवडणूक आयोगाकडे तक्रार केली असली तरी त्यावर काहीही होणार नाही, याची सर्व संबंधितांना खात्री आहे. मंगळसूत्र हिरावून घेण्याच्या विधानावर काँग्रेसनेत्या प्रियांका गांधी यांनी ''देश युद्धाला सामोरा जात असताना इंदिरा गांधींनी त्यांचे मंगळसूत्र आणि दागिने दान केले होते. माझ्या आईने तिचे मंगळसूत्र या देशासाठी गमावले,'' असे उत्तर दिले. हे होत असतानाच काँग्रेसच्या थिंक टँकमधील नेते सॅम पित्रोदा यांनी भाजपच्या हाती नवेच कोलित दिले आहे. संपत्तीच्या वाटपासंदर्भात अमेरिकेतला दाखला देऊन त्यांनी काँग्रेसला अडचणीत आणले. अर्थात, काँग्रेसने याविषयी सारवासारवही केली. सत्य-असत्याचे मिश्रण, कल्पनाविस्तार, विपर्यास अशा विविध आयुधांचा वापर करून 'नरेटिव' तयार करण्यात मोदी हे किती मातब्बर आहेत, हे एव्हाना सगळ्यांना कळून चुकले आहे. संपत्तीच्या पुनर्वितरणाचा मुद्दा त्यामुळेच त्यांनी थेट मंगळसूत्रापर्यंत नेऊन भिडवला. एकूणच चर्चेची भरकटलेली गाडी पुन्हा रूळावर येणार का, हा प्रश्नच आहे.

# इराण, इस्त्राईलचा लष्करी जुगार

**इतिहासात प्रथमच असे घडले असेल की, आपली क्षेपणास्त्रे अडवली जाणार हे माहीत असताना इराणकडून त्यांचा मारा केला गेला. मोठ्या युद्धाची कोणाचीच इच्छा दिसत नाही. मग तरीही इराण व इस्त्राईल हा धोकादायक जुगार का खेळले, हा प्रश्न आहे.**



इराण आणि इस्त्राईलमधील संघर्षाकडे जगाच्या नजरा खिळल्या. याचे कारण यातून घडणारे उत्पात सर्वंकष स्वरूपाचे झाले असते. खरे तर कोणालाच आता युद्ध नको आहे; परंतु या दोन देशांनी एकप्रकारे लष्करी जुगारच खेळला. त्यातून जे नाट्य समोर आले, त्यात जगाचे लक्ष गुंतलेले असताना इस्त्राईल गाझा पट्टीतील हल्ले अधिक तीव्र करण्याची शक्यता व्यक्त होत होती आणि तसेच झाल्याचे दिसते.

इस्त्राईल व इराणमध्ये जो काही संघर्ष घडला, त्यात या दोन्ही देशांचा एकमेकांच्या हवाई संरक्षणयंत्रणेवर आणि क्षेपणास्त्रविरोधी यंत्रणेवर किती विश्वास आहे, हे पाहायला मिळाले! युद्धाच्या इतिहासात प्रथमच असे घडले असेल की, आपली क्षेपणास्त्रे अडवली जाणार हे माहीत असताना त्यांचा मारा केला गेला.

या सगळ्याची सुरुवात एक एप्रिल २०२४ रोजी जेव्हा इस्त्राईलने सीरियातील दमास्कसमधील इराणच्या दूतावासावर हवाई हल्ला केला तेव्हा झाली. या हल्ल्यात इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सचे (आयआरजीसी) सात अधिकारी मृत्युमुखी पडले. यामध्ये दोन वरिष्ठ कमांडरदेखील मारले गेले. यानंतर इराणने या हल्ल्याचा सूड घेतला जाईल, असे जाहीर केले.

इराणच्या 'आयआरजीसी'ने १३ एप्रिल २०२४ रोजी लेबनानच्या हिज्बुल्ला आणि येमनच्या हौथी बंडखोर गटाच्या मदतीने इस्त्राईलवर ड्रोनच्या साहाय्याने क्रूझ आणि बॅलेस्टिक मिसाईल डागली. सुमारे १७० ड्रोनच्या साहाय्याने हा हल्ला करण्यात आला आणि ३० क्रूझ व १२० बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे डागण्यात आली. इराणने या हल्ल्याला 'ऑपरेशन ट्रू प्रॉमिस' असे नाव दिले होते.

या हल्ल्याबाबत इराणने पुरेसे पूर्वसंकेत दिले होते. त्यामुळेच हा हल्ला होण्याआधी येथील काही देशांनी त्यांची हवाई हद्द विमानाच्या उड्डाणासाठी बंद केली होती. त्याचप्रमाणे अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स आणि जॉर्डन यांनी त्यांच्या हवाई दलाला इस्त्राईलला साहाय्य करण्याचे आदेश दिले होते. तसेच कोणत्याही हवाई हालचाली टिपण्यासाठी नौदलाच्या मदतीने रडार यंत्रणाही कार्यान्वित करण्यात आली होती.

इस्त्राईलच्या हवाई संरक्षण यंत्रणेने हा क्षेपणास्त्रहल्ला परतवून लावण्यात सर्वात मोठी भूमिका बजावत जवळपास ९९ टक्के हल्ले परतवून लावले. या हल्ल्यानंतर, इराणच्या नऊ क्षेपणास्त्रांनी इस्त्राईलचे दोन हवाई तळ उद्ध्वस्त केल्याचे स्पष्ट झाले असले तरी या हल्ल्यात कोणतीही मोठी हानी झालेली नाही. त्यानंतर १९ एप्रिल २०२४ रोजी इस्त्राईलकडून इराणवर हल्ला करण्यात आला.

हा हल्ला फारसा तीव्र नसून केवळ एक प्रतिक्रियात्मक संदेश देण्यासाठी केला गेला होता, असे मानले जाते. इराणच्या इस्फहान या प्रदेशावर इस्त्राईलकडून एक क्षेपणास्त्र डागत छोटासा हल्ला करण्यात आला. याच प्रदेशात इराणचे अणुसंशोधन केंद्र आहे. दरम्यान, हा हल्ला क्षेपणास्त्रविरोधी यंत्रणेने यशस्वीपणे परतवून लावल्याचा दावा इराणच्या वतीने करण्यात आला.

या दोन्ही घटनांच्या पार्श्वभूमीवर एक बाब ठळकपणे पुढे आली आणि ती म्हणजे परस्परांचे शेजारी असणाऱ्या दोन्ही देशांना एकमेकांशी थेट निर्णायक युद्ध लढण्यात रस नाही. तर एकमेकांना कठोर संदेश देण्याच्या आणि परस्परांवर वर्चस्व गाजविण्याच्या या साहसी खेळात हे दोन्ही देश अवाजवी धोका पत्करत आहेत.

इराणकडून करण्यात आलेला हवाईहल्ला जरी खूप मोठा असला तरीदेखील इस्त्राईलच्या क्षेपणास्त्रविरोधी यंत्रणेकडून हा हल्ला यशस्वीपणे परतवून लावण्यात येईल आणि या हल्ल्यातून फार मोठे नुकसान होणार नाही, याची कल्पना इराणला असावी.

अर्थात इस्त्राईलची क्षेपणास्त्रविरोधी यंत्रणा कितपत काम करते, हे तपासण्याइतकाच हा हल्ला मर्यादित आणि छोटा मात्र नक्कीच नव्हता. त्याचप्रमाणे आणीबाणीची परिस्थिती उद्भवल्यास पाश्चात्त्य देश येथे लष्करी मदत पाठवतील की नाही याचीही चाचपणी करण्यासाठी या हल्ल्याची इराणला नक्कीच मदत झाली. युक्रेनला केली जात आहे त्याप्रमाणे अप्रत्यक्ष मदत करण्याऐवजी अमेरिका आणि मित्रदेश हे इस्त्राईलला थेट लष्करी मदत करतील, हेही इराणला आता कळून चुकले आहे.

या हल्ल्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे इराणने केलेला हल्ला आणि इस्त्राईलने दिलेले प्रत्युत्तर या दोघांचेही स्वरूप अत्यंत वेगळे होते. इस्त्राईलवर यावेळी करण्यात आलेले हल्ले हे बहुतांश इराणच्या भूमीतून करण्यात आले होते. तर हिज्बुल्लाने गोलन टेकड्यांच्या भागात इस्त्राईलच्या लष्करी तळावर रॉकेट हल्ला केला. याशिवाय इराक, सीरिया आणि येमेनमधून इस्त्राईलवर ड्रोनहल्ले करण्यात आले. दुसरीकडे इस्त्राईलची बहुस्तरीय हवाई संरक्षण यंत्रणा हे सर्व हल्ले परतवून लावण्यात यशस्वी ठरली.

इस्त्राईलकडे प्रामुख्याने आयर्न डोम, डेव्हिड्स स्लिंग आणि 'ॲरो- २' व 'ॲरो- ३' या क्षेपणास्त्रविरोधी यंत्रणा आहेत. यापैकी 'आयर्न डोम' ही सर्वात प्रसिद्ध असून या यंत्रणेच्या माध्यमातून लहान पल्ल्याच्या क्षेपणास्त्राला अवकाशात नष्ट करता येते.

सुमारे एका दशकाहून अधिक काळ इस्त्राईलवर 'हमास' किंवा हिज्बुल्ला या दहशतवादी संघटनांकडून लहान पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांचा मारा करण्यात येत असून ही क्षेपणास्त्रे आकाशातच नष्ट करण्यात 'आयर्न डोम' यंत्रणेला ९९ टक्के यश आले आहे. 'डेव्हिड्स स्लिंग' ही यंत्रणा लहान ते मध्यम पल्ल्याच्या क्षेपणास्त्राला नष्ट करण्यात उपयोगी येते. तर 'ॲरो' ही यंत्रणा मध्यम ते दीर्घ पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांना नष्ट करते.

तेरा एप्रिल रोजी करण्यात आलेला हल्ला इतिहासातील सर्वात मोठा ड्रोनहल्ला म्हणून गणला जाऊ शकतो. मात्र असे असतानाही हा हल्ला परतवून लावण्यात इस्त्राईलला यश आले. अशा पद्धतीचा हल्ला परतवून लावण्यात येईल याची इराणला खात्री होती का? हा हल्ला करून इराणने खूप मोठा धोका पत्करला होता. याचे कारण इस्त्राईलला जर हल्ला परतवून लावण्यात अपयश आले असते आणि इस्त्राईलचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असते, तर मात्र इस्त्राईलने मोठी लष्करी कारवाई करत या हल्ल्याचा सूड घेतला असता.

मोठे युद्ध भडकले असते. इस्त्राईलची संपूर्ण संरक्षणयंत्रणा ही गाझामधील युद्धात गुंतलेली असल्याची इराणला पूर्ण जाणीव असल्याने इराणला इस्त्राईलशी संघर्ष वाढवण्याची इच्छा असल्याची एक पुसट शक्यताही या व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे इस्त्राईलकडून प्रत्युत्तरादाखल देण्यात आलेला संदेश हा देखील तितकाच धोक्याचा होता. कारण इस्त्राईलने इराणच्या ज्या भागात हल्ला केला होता तेथे अणुसंशोधन केंद्र असून, जराही चूक झाली असती तरी मोठा अनर्थ ओढवला असता.

तात्पर्य हे की, इराण आणि इस्त्राईल हे दोन्ही देश जरी मोजून-मापून धोका पत्करत असतील तरी तो अनावश्यक असून, या प्रयत्नांत जरा जरी अनर्थ झाला तरी ती पूर्ण ताकदीनिशी लढल्या जाऊ शकणाऱ्या युद्धाची नांदी ठरू शकते. त्यामुळेच अमेरिकेसारख्या देशांनी वेळीच मध्यस्थाची भूमिका निभावत दोन्ही देशांमधील तणाव निवळण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत.

## Powerlifter Gaurav Sharma receives honorary doctorate by US varsity for sporting excellence



■ NEW DELHI : World champion and powerlifter Gaurav Sharma was conferred with an honorary doctorate degree by the American University for his work in the field of sports. Powerlifter Gaurav Sharma was given the certificate of Doctor of Philosophy during a special event in New Delhi. He was quite elated to receive the certificate and said that this honour will boost his morale to work more in the field of sports.

"This honor is very special to me and I want to thank everyone who helped me in my journey so far. This recognition will boost my morale to work more in the field of sports and help my country in becoming a global sports' powerhouse," Gaurav Sharma said in a statement. The Delhi athlete had clinched two gold medals at the 2016 World Powerlifting Championships in England. In 2007, he won four gold medals at the Commonwealth Championships in New Zealand. Initially starting out as a weightlifter, Gaurav later switched to powerlifting. He is also a Mahant in a temple in Chandni Chowk, Old Delhi.In a recent interaction with the media, Gaurav Sharma expressed optimism about India's prospects at the upcoming Paris Olympics, attributing it to the support and international exposure provided to athletes by the Central government in recent years. Over the past few editions, the participation of Indian athletes at the Olympics has steadily increased.

At Tokyo 2020, the Indian contingent was made up of 124 athletes, the largest that the country had sent to the Games. India also bagged seven medals, their biggest haul in a single Olympics - including Neeraj Chopra's historic gold medal in the men's javelin throw. This year, the country will expect more athletes to qualify and increase the Tokyo Olympics medal haul.

## मुंबई-अहमदाबाद मार्गावरील अपघातांत घट

### दोन वर्षात १७३ जणांचा मृत्यू, तर २९५ जण जखमी

■ महामार्गावर होणारे अपघात रोखण्यासाठी प्राधिकरणाकडून वर्षभरापासून रमलर लावणे, रस्ते दुरुस्ती, सूचना फलक लावणे अशा उपाययोजना आखल्या जात आहेत. मात्र त्यासुद्धा उपाययोजना अपुऱ्या आहेत. अजून बहुतांश उड्डाणपुलांवर पथदिव्यांचा अभाव आहे. त्यामुळे रात्रीच्या सुमारास वाहनचालकांना अडचणी येतात. दुसरीकडे जे सेवारस्ते आहेत, ते कचरा व राडारोडाने भरलेले आहेत. त्यामुळे विश्रांतीसाठीची वाहने सुद्धा मुख्य रस्त्यावर उभी करण्यात येत असल्याचे दिसून येते.

■ नालासोपारा : मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर वसई विरार पट्ट्यातील अपघातांचे प्रमाण घटले आहे. २०२२ आणि २०२३ या दोन वर्षांच्या तुलनेत अपघातांचे प्रमाण आणि अपघातात मृत्यू पावण्याचे प्रमाण साधारण १० ते ११ टक्क्यांनी घटले आहे. मागील दोन वर्षांत मुंबई-अहमदाबाद महामार्गावर १७३ जणांचा मृत्यू, तर २९५ जण जखमी झाले आहेत. अपघातात मृत्यू पावण्याचे प्रमाण घटले आहे. ही दिलासादायक बाब असली तरी महामार्गावरील अपघातांचा धोका मात्र कायम आहे.

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर दिवसेंदिवस वाहनांची वर्दळ जास्त वाढली आहे. शिवाय अपघाताचे प्रमाणही वाढले आहे. विशेषतः महामार्गावर अपघाती मृत्यू होण्याचे प्रमाण अधिक आहे. अतिवेगाने वाहने चालवणे, वाहनांवरील नियंत्रण सुटणे, बंद वाहनांना धडक लागणे, काही भागात रस्त्याची झालेली लेन कटिंग, अपुऱ्या दुभाजक, पथदिव्यांचा अभाव अशा विविध कारणांमुळे अपघात घडत असतात. मात्र २०२२ आणि २०२३ वर्षांची आकडेवारी बघता अपघात ११.५२ टक्क्यांनी घटले आहेत. तर १०.५९ टक्क्यांनी अपघातात मृत्युमुखी पडण्याची संख्या घटली आहे. २०२२ या वर्षात एकूण १९१ अपघाताच्या घटना घडल्या. त्यात ८५ जणांचा मृत्यू झाला आणि १४५ जण जखमी झाले. २०२३ वर्षात एकूण १६९ अपघात झाले. या अपघातांमध्ये ७६ जणांचा मृत्यू झाला आणि ११९ जण जखमी झाले.



## On Sam Pitroda's 'inheritance tax' remark

# Nirmala Sitharaman's dig at Congress

■ NEW DELHI : Union finance minister Nirmala Sitharaman on Friday took a dig at the Congress over its leader Sam Pitroda's controversial remarks advocating an inheritance tax-like law, saying it could "nullify" India's progress of the last 10 years.



The finance minister said if done so, the country would go back to the era when Congress imposed a 90 per cent tax.

"The inheritance tax directly hits the middle class. It directly hits the aspirational class. They work hard, sweat and toil of theirs are saved in small savings here and there, or they buy a house, a dream house, and keep some fixed deposits. All this is going to be exposed to the so-called property tax... After all, Congress's reputation in terms of property tax goes back," Nirmala Sitharaman told news agency ANI.

Recalling the compulsory deposit scheme from 1968, Nirmala Sitharaman said, "Something was taken away. There was no justification given at that time... If such wealth creators are going to be punished purely because they have some money kept behind, India's progress in the last 10 years would just go for a zero... The current generation would not even remember or know anything about it."

"There was India, where under the Congress rule, we paid 90% of all that was earned by us as tax. That's the socialist model which the Congress party is comfortable with," the finance minister added.

Nirmala Sitharaman's comments come days after a video of Indian Overseas Congress chairman Sam Pitroda went viral on social media in which he talked about inheritance tax in America. The video triggered a massive outrage, especially with the BJP leaders, who attacked the grand old party.

In the video, Sam Pitroda was heard saying, "In America, there is an inheritance tax. So, if, let's say, one has $100 million worth of wealth, and when he dies, he can only transfer probably 45 per cent to his children, the government grabs 55 per cent. That's an interesting law. It says you in your generation, made wealth and you are leaving now, you must leave your wealth for the public, not all of it, half of it, which to me sounds fair. In India, you don't have that. If somebody is worth 10 billion and he dies, his children get 10 billion and the public gets nothing... So, these are the kinds of issues people will have to debate and discuss."

He added, "I don't know what the conclusion would be at the end of the day but when we talk about redistributing wealth, we are talking about new policies and new programs that are in the interest of the people and not in the interest of the super-rich only."

Prime Minister Narendra Modi had also hit out at Pitroda saying that the "dangerous intentions of the Congress Party are now being exposed".

However, the Congress has distanced itself from the remarks and said that inheritance tax laws do not reflect the position of the party.

## SC Issues Directions to Seal Symbol Loading Unit But Rejects Plea for 100% EVM-VVPAT Verification

■ NEW DELHI : Rejecting pleas seeking complete cross-verification of votes cast using EVMs with VVPAT, the Supreme Court on Friday issued two directives. Firstly, the Symbol Loading Unit (SLU) should be sealed and secured in containers. Secondly, the burnt memory semi-controller in EVMs shall be checked and verified by a team of engineers from the manufacturers of the EVM post the announcement of results.

Here are the two directives in details:

1) That on completion of the symbol loading process in the VVPAT undertaken on or after 01.05.2024, the Symbol Loading Unit (SLU) should be sealed and secured in containers, Live Law stated. The report further stated that the candidates or their representatives shall sign the seal. The sealed containers containing the SLUs shall be kept in the strong rooms along with the EVMs at least for a period of 45 days post the declaration of results. They should be opened and examined and dealt with as in the case of EVMs.



(2) According to Live Law, the burnt memory semi-controller in 5% of the EVMs, that is the Control Unit, Ballot Unit and the VVPAT, per assembly segment of the Parliamentary constituency, shall be checked and verified by a team of engineers from the manufacturers of the EVM post the announcement of results on a written request made by candidates who are at places 2 and 3 behind the highest polled candidate.

Such candidates or their representatives shall identify the EVMs by the polling station or the serial number. All candidates and their representatives shall have the option to remain present at the time of verification, the report stated.

Live Law further mentioned that such a request should be made within 7 days of the declaration of the results. The District Election Officer, in consultation with the team of engineers, shall certify the authenticity and intactness of the burnt memory microcontroller. After the verification process is conducted, the actual cost or the expenses for the said verification will be notified by the ECI and the candidate making the said request will make payment of the said expenses. Expenses will be refunded in case the EVMs are found to be tampered.

## डोंबिवलीत आढळला महिलेचा मृतदेह

■ **डोंबिवली** : डोंबिवली पश्चिमेस असलेल्या ५२ चाळ परिसरात रेल्वेच्या मोकळ्या जागेत एका महिलेचा मृतदेह सापडला आहे .यापूर्वी देखील या निर्मनुष्य आणि अंधार असलेल्या भागात मृतदेह आणून टाकण्यात आले होते.अंधाराचा आणि निर्मनुष्य भाग पाहून खून व बलात्कार करण्याच्या घटना देखील घडल्या असल्याची पार्श्वभूमी असल्याने या घटनेने शहरात एकच खळबळ उडाली आहे. डोंबिवली पश्चिमेस ठाकुर्ली जवळ रेल्वेची मोठी मोकळी जागा आहे.

## बनावट प्रमाणपत्राच्या मदतीने ८ वर्षे एसटीत केली नोकरी

■ **ठाणे** : राज्य परिवहन सेवा महामंडळाच्या सेवेत टंकलेखनाच्या बनावट मराठी आणि इंग्रजी प्रमाणपत्रावर तब्बल आठ वर्षे अनुकंपा तत्त्वावर लिपिक या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यास अखेर बडतर्फ करण्यात आले आहे. विवेक धनंजय चव्हाण(३७) असे त्याचे नाव असून त्याने महामंडळात २९ एप्रिल, २०१६ ते ८ जानेवारी, २०२४ पर्यंत लिपिक पदावर काम केले होते. याप्रकरणी नितीन भास्कर आयरे(५८) यांनी नौपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. महामंडळात नवनियुक्त कर्मचाऱ्याचे शैक्षणिक कागदपत्र तपासणी करावयाच्या सुचना प्राप्त झाल्याने तत्कालीन विभाग नियंत्रक ठाणे विभाग यांनी विभागातील नवीन रूजू झालेले टंकलेखकाचे प्रमाणपत्र हे पडताळणीकरता पाठवण्यात आले होते. या प्रमाणपत्राची पडताळणी महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद पुणे यांचे मार्फत करण्यात आली.

## कोणार्क बँकेवर आरबीआयचे निर्बंध

■ **उल्हासनगर** : रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने उल्हासनगरातील कोणार्क अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेवर निधी काढण्यासह अनेक निर्बंध लादले आहेत. बँकेची आर्थिक स्थिती बिकट पाहता बँकेवर हे निर्बंध लादण्यात आले आहेत. डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन कडून पात्र ठेवीदारांना त्यांच्या ठेवींमधून ५ लाख रुपयांपर्यंतच्या ठेव विमा दाव्याची रक्कम प्राप्त करण्याचा अधिकार असणार आहे. दरम्यान या घटनेमुळे खातेदारांत खळबळ उडाली आहे. बँकिंग नियमन कायदा १९४५ च्या कलम ३५अ अंतर्गत कोणार्क अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेवरील निर्बंध २३ एप्रिल २०२४ (मंगळवार) रोजी व्यवसाय बंद झाल्यापासून लागू झाले आहेत.

# अनधिकृत बांधकामांना निवडणुकीचा आधार?

## पालिका उपायुक्तांकडून प्रभाग अधिकाऱ्यांना कारवाईचे आदेश

■ **भिवंडी** : भिवंडी महापालिका हद्दीत अनधिकृत बांधकामांनी जोर धरला असून निवडणूक काळात पालिकेचे कर्मचारी वर्ग निवडणूक कामात व्यस्त आहेत. कर्मचारी कमी असल्याचा गैरफायदा घेत ठिकठिकाणी काही विकासकांनी शासकीय आदेश धाब्यावर बसवून अनधिकृत बांधकामांना सुरुवात केली आहे. पालिकेचे काही प्रभाग अधिकारी व बिट निरीक्षक हे आयुक्त व इतर अधिकाऱ्यांचे नावाने अर्थकारण करीत चिरीमिरी घेत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या. त्यावर पालिका उपायुक्त नयना ससाणे यांनी पाच प्रभागांतील सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकाऱ्यांना १५ दिवसांत कारवाई करून फोटोसह अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. कारवाई न केल्यास प्रभाग अधिकारी व बिट निरीक्षकांवर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे पालिका वर्तुळात खळबळ उडाली आहे.

पालिका कार्यक्षेत्रात अनधिकृत बांधकाम होऊ नये यासाठी काळजी घ्यावी, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. मात्र आयुक्त प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केल्याने काही नागरिकांनी न्यायालयात धाव घेतली असल्याची चर्चा आहे. सध्या भिवंडी लोकसभा निवडणुकीचे काम सुरू असल्याने शासकीय व निमशासकीय कार्यालयातील बरेच कर्मचारी निवडणूक कामात गुंतले आहे. तर काही कर्मचारी निवडणुकीचा बहाणा करीत वैयक्तिक कामासाठी

■ यासंदर्भात कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल फोटोसह १५ दिवसांत सादर करावा, असे लेखी आदेश सर्व प्रभाग समितीमधील अधिकाऱ्यांना दिले आहेत. याबाबत दिरंगाई केल्यास अथवा भविष्यात काही दुर्घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी आपणावर निश्चित करण्यात येईल, असाही लेखी आदेशात दिल्याची माहिती ससाणे यांनी दिली.



बाहेर पडत असल्याने अनेक ठिकाणी नागरिकांची कामे खोळंबली आहेत. पालिकेतील विविध विभागांतील कर्मचारी निवडणूक कार्यालयात गुंतल्याचा फायदा घेत शहरातील पालिकेच्या १ ते ५ प्रभाग समितीच्या कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे सुरू आहेत.

आठवड्यातील पाच दिवस स्लॅब ठोकण्याचे काम सुरू असते. तर प्रत्येक शनिवारी-रविवारी आणि सुट्टीच्या दिवशी स्लॅब भरण्याचे काम सुरू असते.

या बांधकामाबाबत काही नागरिकांनी प्रभाग अधिकारी व बिट निरीक्षकांकडे तक्रारी केल्या, मात्र अर्थकारण करून वरिष्ठांच्या नावावर चिरीमिरी सुरू असल्याने अधिकारी जाणीवपूर्वक तक्रारींकडे कानाडोळा करत असल्याचा नागरिकांचा आरोप आहे. अखेर नागरिकांनी पालिका वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार केली आहे. त्या अनुषंगाने सर्व प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त तथा प्रभारी प्रभाग अधिकाऱ्यांनी अनधिकृत बांधकाम, धोकादायक व अतिधोकादायक बांधकाम, तसेच अतिक्रमण करणाऱ्यांवर नियमानुसार कायदेशीर कारवाई करावी, असे आदेश उपायुक्त नयना ससाणे यांनी दिले आहेत.

## मोस्ट वॉन्टेड चोरटा पोलिसांच्या ताब्यात

■ **कल्याण** : देशभरात शंभरहून अधिक चोरीचे गुन्हे दाखल असलेल्या मोस्ट वॉन्टेड चोरट्याला कल्याणच्या कोळसेवाडी पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. रामविलास उर्फ रामा गुप्ता असे त्याचे नाव आहे. तब्बल सहा राज्यातील पोलीस त्याच्या मागावर होते. या दरम्यान तो गुजरात पोलिसांच्या तावडीतून निसटला होता. मात्र पोलिसांनी त्याला शिताफीने पकडत पुन्हा गुजरात पोलिसांच्या स्वाधीन केले.

गुजरात पोलिस रामविलास गुप्ता या आरोपीला ठाण्यात एका तपासानिमित्त १० एप्रिलला ठाणे नगर येथे घेऊन आले होते. या दरम्यान पोलिसांच्या हातावर तुरी देत रामविलास गुजरात पोलिसांच्या तावडीतून निसटला होता.उत्तर प्रदेशात राहणारा रामविलास गुप्ता हा कुख्यात चोरटा असुन त्याने देशभरात चोरीचे गुन्हे केले आहेत. शंभरहून जास्त गुन्हे त्याच्या विरोधात दाखल आहेत. महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, गुजरात, दिल्ली, आंध्रप्रदेश या राज्यात तो अनेक गुन्ह्यात फरार होता.पोलिसांच्या ताब्यातून तो निसटल्याने त्याच्या शोधात अनेक पोलिस पथके काम करत होती. कोळसेवाडी पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक कदम यांना रामविलासबद्दल पोलिस अधिकारी दिनकर पगारे यांनी माहिती दिली.त्यानुसार कल्याणचे पोलीस उपायुक्त सचिन गुंजाळ, सहाय्यक पोलिस आयुक्त कल्याणजी घेटे,वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक कदम यांच्या मार्गदर्शनाखाली दिनकर पगारे यांचे पोलिस पथक कल्याणनजिक म्हारळ परिसरातील एका ढाब्यावर पोहोचले. त्याठिकाणी बसलेल्या रामविलासला पोलिसांनी चारही बाजूंनी घेरत ताब्यात घेतले.

# विना परवानगी बॅनरबाजी केल्यास कारवाई होणार

## मंडप कॉन्ट्रॅक्टर्स, मुद्रक, प्रकाशकांना आयुक्तांचा इशारा

■ **कल्याण** : लोकसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता सध्या सुरू आहे. त्यामुळे कल्याण - डोंबिवली महापालिकेची परवानगी न घेता विनापरवाना निवडणुक विषयक पोस्टर्स, बॅनर्स, होर्डिंग्ज, फलक, झेंडे, कमानी लावल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल असा इशारा पालिका आयुक्त डॉ. इंदूराणी जाखड़ यांनी दिले आहेत. २४ - कल्याण आणि २३ - भिवंडी लोकसभा क्षेत्रातील मंडप कॉन्ट्रॅक्टर्स, मुद्रक, प्रकाशक यांच्या समवेत पालिका मुख्यालयात आयोजित बैठकी प्रसंगी त्या बोलत होत्या.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त मंगेश चितळे, निवडणूक उपायुक्त रमेश मिसाळ यांच्यासह सर्व प्रभागांचे सहाय्यक आयुक्त आदी अधिकारी उपस्थित होते. यावेळी आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांनी निवडणुकीचे प्रचार



साहित्य प्रकाशित करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

प्रिंटींग प्रेसच्या मालकाने उमेदवारांचे, पक्षाचे साहित्य छपाईची ऑर्डर स्वीकारतांना दोन व्यक्तींच्या ओळखीसह त्यांच्या प्रतिनिधीच्या ओळखपत्रासह प्रचार साहित्याची ऑर्डर स्विकारावी, साहित्य छपाई करतांना एकूण प्रतींची संख्या व प्रत्येक प्रतीवर त्या प्रतीचा अनुक्रमांक असणे आवश्यक आहे, पोस्टर्स, बॅनर्स, होर्डिंग्ज, फलक, कमानी प्रिंट करणारे मालक यांनी सुध्दा उमेदवारांचे, पक्षाचे साहित्य छपाईची ऑर्डर स्वीकारतांना दोन व्यक्तींच्या ओळखीसह त्यांच्या प्रतिनिधीचे ओळखपत्रासह ऑर्डर स्विकारावी, पालिकेची रितसर परवानगी घेऊनच पोस्टर्स, बॅनर्स, होर्डिंग्ज, फलक, कमानी लावाव्यात, त्यांच्या प्रत्येक प्रतीवर अनुक्रमांक असणे आवश्यक आहेत.

■ पालिकेकडून करारावर जाहिरातीच्या जागा घेतलेल्या एजन्सी मालकांनी कोणतीही निवडणुक विषयक जाहिरात ठराविक एका पक्षाला देऊ नये, समान न्यायाचे तत्व अवलंबवावे, त्याबाबत उमेदवार, पक्ष यांच्यासोबत झालेला करार, त्यासाठी झालेल्या खर्चाचा तपशील संबंधिताने पालिका व संबंधित निवडणुक निर्णय अधिकाऱ्याकडे तातडीने सादर करणे आवश्यक असल्याच्याही सुचना आयुक्त डॉ. इंदू राणी जाखड़ यांनी दिल्या.

अशा स्पष्ट सुचना दिल्या.पोस्टर्स, बॅनर्स, होर्डिंग्ज, फलक, कमानीवर पालिकेची परवानगी क्रमांक, मुदत, प्रकाशक, पब्लिशर्सचे नांव, मोबाईल क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

# फुलमार्केटची शेड धोकादायक

## एपीएमसीतर्फे बी-टाईप इमारतीत पर्यायी जागा

■ **कल्याण** : कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात असलेल्या पालिकेच्या फुलमार्केटची तात्पुरती शेड धोकादायक झाली आहे. त्यामुळे या ठिकाणी अनुचित घटना होण्याची शक्यता असल्याने एपीएमसी प्रशासनाने येथील फुल बाजार बंद करण्याची नोटीस बजावली आहे.मात्र येथील फुल व्यापाऱ्यांच्या रोजीरोटीचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून मानवतेच्या दृष्टीकोनातून एपीएमसीतर्फे बी - टाईप इमारतीत त्यांना पर्यायी जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य बाजार आवारात विविध बाजार आवार कार्यरत आहेत. याठिकाणी व्यापारी, ग्राहक, नागरिकांची शेतमाल खरेदी - विक्रीसाठी नेहमीच वर्दळ असते. याच ठिकाणी कल्याण - डोंबिवली



महापालिकेने पत्राशेडचे बांधकाम केलेले फुल मार्केटही आहे. मात्र ते मोडकळीस आल्याने २०१९ मध्ये निष्कासित करण्यात आले. त्यानंतर न्यायालयाच्या आदेशानुसार या शेडमध्ये व्यवसाय करणाऱ्या फुल व्यावसायिकांसाठी तात्पुरती व्यवस्था म्हणून बांबू - ताडपत्रीची शेड एपीएमसीतर्फे उभारण्यात आली. मागील पाच वर्षापासून या ठिकाणी फुल व्यावसायिक व्यवसाय करत आहेत. मात्र दरवर्षी पावसाळ्यात या शेडमध्ये पुराचे पाणी शिरते.त्यामुळे शेडचे बांबू, वासे कुजले असुन ऊन, वारा, पावसामुळे शेड कमकुवत होऊन एका बाजूला देखील झुकली आहे.अशा धोकादायक स्थितीतील या शेडमध्ये अपघात घडून जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

ही शेड दुरुस्त करण्याची मागणी करत तोपर्यंत पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी फुलमार्केट व्यापारी संघटनेने बाजार समितीकडे केली होती. त्याची दखल घेत एपीएमसी प्रशासनाने फळ आणि भाजीपाला बाजार विभाग - २ मधील बी - टाईप इमारतीत फुल व्यापाऱ्यांना तात्पुरती जागा उपलब्ध करून दिली आहे. व्यापाऱ्यांनी तत्काळ या ठिकाणीं स्थलांतर करण्याचे आवाहन कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती कपिल थळे यांनी केले आहे. मात्र त्यानंतरही जे व्यापारी तात्पुरत्या शेडमध्ये व्यवसाय करतील, तेथे अनुचित घटना अथवा अपघात घडल्यास बाजार समिती जबाबदार राहणार नाही असे परिपत्रकच त्यांनी लावले आहे.

# भिवंडीतील जीन्स गोदामास आग

■ **भिवंडी** : भिवंडी शहरातील नवीबस्ती नेहरू नगर येथील निवासी इमारतीच्या तळमजल्यावरील जीन्स बनवणाऱ्या कारखान्याचे गोदामास भीषण आग लागली.या आगीत मोठ्या प्रमाणात मालमत्ता जळून खाक झाली.अग्निशामक दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन ही आग तीन तासात आटोक्यात आणली.

भिवंडी शहरातील कल्याण रोड भागातील नवीबस्ती नेहरू नगर येथील निवासी इमारतीच्या तळमजल्यावरील जीन्स बनवणाऱ्या कारखान्याचे गोदाम आहे.दुपारी अचानकपणे या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर धूर निघू लागला. त्यामुळे तेथील नागरिकांनी आरडाओरडा



सुरू केली.

पहाता पहाता येथे मोठ्या प्रमाणात आग लागून रौद्ररूप धारण केल्याने स्थानिक नागरिकांनी पोलीस व अग्निशमन दलाच्या जवानांना पाचारण केले. त्यामुळे घटनास्थळी जवानांनी धाव घेऊन आग विझवण्याची सुरुवात केली. आगीच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात धुर वाढू लागल्यानेआग विझवण्यात जवानांना अडचणी येत होत्या.या धुराचा त्रास मोठ्या प्रमाणावर निवासी इमारती मधील कुटुंबियांना झाल्याने त्यांनी घरा बाहेर पडत सुरक्षित ठिकाणी धाव घेतली.


या आगीची माहिती मिळताच भिवंडी अग्निशामक दलाच्या जवानांनी तीन तासांच्या अथक प्रयत्नानंतर या आगीवर नियंत्रण मिळवले.

# ठाणे शहराची हवा सुधारत असल्याने नागरिकांना मोठा दिलासा

## सध्या हवेचा गुणवत्ता निर्देशांक सरासरी ८४

■ **ठाणे** : ठाणे महापालिका क्षेत्रात मागील काही दिवसात हवेचा गुणवत्ता निर्देशांक सरासरीपेक्षा कमी आढळला आहे. त्यामुळे हवेची गुणवत्ता सुधारत असल्याचे दिसून येत आहे. सध्या हवेचा गुणवत्ता निदेर्शांक सरासरी ८४ एवढा आढळला आहे.ही ठाणेकर नागरिकांना दिलासा देणारी बाब ठरत आहे.

प्रदूषण विभागामार्फत हवेतील दर्जा तपासण्याबाबत सहा गट केलेले आहेत. यात हिरवा, पोपटी ,पिवळा, नारंगी, लाल आणि गडद तपकिरी या रंगाचा समावेश असतो. त्यात हिरवा रंग अति शुद्ध हवा म्हणून नोंद होते. तर हलका हिरवा हा शुद्ध, पिवळ्या रंगात मध्यम शुद्ध, नारंगी रंगात प्रदूषित तर लाल रंग असलेला परिसर अति प्रदूषित गटात मोडतो. तर गडद तपकिरी सर्वात जास्त प्रदूषित या गटात मोडतो. सध्या ठाणे शहर परिसर हा हिरव्या रंगाच्या गटात येत आहे. ठाणे महापालिका हद्दीत घोडबंदर, तीन हाता नाका आणि उपवन येथील हवा मध्यम प्रदुषित गटात मोडत होती. परंतु एप्रिल महिन्यांत शहराची हवेची गुणवत्ता शुध्द गटात अर्थात हिरव्या रंगात आली आहे. त्यामुळे ठाण्याची हवा सध्या नागरिकांसाठी चांगली असल्याचे समाधानकारक चित्र दिसत आहे. तीन हात नाका येथील हवेचा गुणवत्ता निर्देशांक देखील खाली आला आहे. या ठिकाणी करण्यात आलेल्या विविध स्वरुपाच्या उपाय योजनांमुळे येथील हवेचा गुणवत्ता निर्देशांक सुधारल्याचे चित्र दिसत आहे. तसेच आता उपवन येथील हवेचा गुणवत्ता निर्देशांक देखील कमालीचा सुधारल्याचे चित्र दिसून आले असून येथील हवेची सरासरी गुणवत्ता निर्देशांक २४ एप्रिल रोजी ७४ एवढा आढळला आहे. तर घोडबंदर भागातील हवेचा गुणवत्ता निर्देशांक याच दिवशी ९४ आढळला आहे. त्यातही या तीनही ठिकाणचा हवेचा गुणवत्ता निर्देशांक एप्रिल महिन्यातील १६ तारखेला सरासरी १२३ एवढा आढळून आला आहे.




# स्ट्रक्चरल ऑडिट नोटिसांकडे सोसायट्यांनी फिरवली पाठ

## मीरा भाईंदरमध्ये २८ इमारती अतिधोकादायक

■ **मीरा रोड** : मीरा भाईंदर शहरातील पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ३० वर्षांहून अधिक जुन्या व मोडकळीस आलेल्या धोकादायक इमारतीचे सर्वेक्षण महापालिकेकडून करण्यात आले आहे. सर्वेक्षण केल्यानंतर धोकादायक आढळून आलेल्या इमारतींना संरचनात्मक परीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करून घेण्याच्या नोटिसा पालिकेने बजावल्या होत्या. नोटिसा पाठवल्यानंतर त्यातील काही इमारतींनीच स्ट्रक्चरल ऑडिट करून त्याचा अहवाल पालिकेला सादर केला आहे. तर अनेक सोसायट्यांनी स्ट्रक्चरल ऑडिटच्या नोटिसांकडे पाठ फिरवली आहे. पालिकेने केलेल्या सर्वेक्षणात २८ इमारती सी-१ श्रेणीतील म्हणजे अतिधोकादायक व राहण्यास अयोग्य आढळल्या आहेत.

मीरा-भाईंदर शहरात अनेक जुन्या इमारती आहेत. पावसाळ्यात धोकादायक इमारती पडून अपघात होण्याची शक्यता असते. त्यामुळे महापालिकेकडून खबरदारी घेतली जाते व विविध उपाययोजना केल्या जातात. पालिका हद्दीतील मीरा रोड व भाईंदर पश्चिमेला अनेक जुन्या इमारती आहेत. यातील काही धोकादायक मोकळ्या इमारती कोसळल्याची घटना घडल्या आहेत. तर नागरिक राहत असलेल्या काही जुन्या इमारतींचा भाग कोसळला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अतिधोकादायक व धोकायदायक इमारतींची यादी पालिकेकडून पावसाळ्यापूर्वी दरवर्षी प्रसिद्ध करण्यात येते. पालिकेने शहरातील मोडकळीस आलेल्या १,६४८ इमारतींना स्ट्रक्चरल ऑडिटच्या नोटिसा पाठवल्या आहेत. यापैकी फक्त ५२० इमारतींनीच ऑडिट करून पालिकेला अहवाल सादर केला आहे. ज्या ५२० इमारतींनी स्ट्रक्चरल ऑडिटचा अहवाल सादर केला आहे. त्यापैकी २८ इमारती सी-१ श्रेणीतील म्हणजेच अतिधोकादायक व राहण्यास अयोग्य आहेत. त्यातील अतिधोकादायक चार इमारती महापालिकेने तोडल्या. तर सात इमारती रिकाम्या करण्यात आल्या आहेत. दोन इमारती तोडण्याचे काम सुरू आहे. दोन इमारतींचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. उर्वरित धोकादायक इमारती पाडण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे. या इमारतींची वेळीच देखभाल व दुरुस्ती न केल्यास भविष्यात अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आता प्रथमतः देखभाल दुरुस्तीची आवश्यकता वाटणाऱ्या इमारतीचे पालिकेच्या पॅनलवरील अभियंत्याकडून ऑडिट करण्याचा निर्णय आयुक्त संजय काटकर यांच्याकडून नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत घेण्यात आला आहे.

■ अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यकतेप्रमाणे दुरुस्तीच्या सूचना सोसायट्यांना दिल्या जाणार आहेत. तसेच ज्या इमारतीचे ऑडिट झालेले नाही, तिचे ऑडिट पालिकेने आता स्वतःच करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच त्याचा सर्व खर्च संबंधित इमारतीकडून वसूल करावा किंवा संबंधित सोसायटीच्या मालमत्ता करदेयकात जोडून वसूल करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले आहेत.

## ऑनलाइन फसवणुकीची रक्कम मिळाली परत

■ **मीरा रोड** : काशिगांव पोलीस ठाणे हद्दीतील तरुणाची वर्क फ्रॉम होमच्या नावाखाली ऑनलाइन यूट्युब व्हिडिओ लाईक स्टास्क, ऑनलाइन हॉटेल, मूव्ही रेटिंगमध्ये गुंतवणूक करण्यास सांगून फसवणूक केली होती. फसवणूक केलेली संपूर्ण रक्कम ३ लाख ४५ हजार रुपये तक्रारदाराला काशिगांव पोलिसांनी परत मिळवून दिली आहे.

काशिगांव पोलीस ठाणे परिसरात राहणारे रिशु जयस्वाल (३०, रा. मीरा रोड पूर्व) वर्क फ्रॉम होमच्या नावाखाली ऑनलाइन यूट्युब व्हिडिओ लाईक स्टास्क, ऑनलाइन हॉटेल, मूव्ही रेटिंग यांना लाईक अथवा गुंतवणूक केल्यास अधिक नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून ३ लाख ४५ हजार रुपयांची फसवणूक केली होती. याप्रकरणी काशिमीरा पोलीस ठाण्यात विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. याबाबत तात्काळ गुन्हा दाखल करून तक्रारदाराच्या झालेल्या व्यवहाराबाबत माहिती गोळा करण्यात आली.

त्यानुसार तक्रारदाराची रक्कम वेगवेगळ्या बँक खात्यात वळती झाल्याचे दिसून आले. त्याअनुषंगाने तक्रारदाराची रक्कम गोठवण्याबाबत संबंधित बँकेसोबत पत्रव्यवहार करून संशयित खात्यात रक्कम गोठवण्यात आली. नंतर न्यायालयाकडून तक्रारदाराची रक्कम परत मिळवण्यासाठी काशिमीरा पोलीस ठाण्याचे अधिकारी, अंमलदारांनी वेळोवेळी पाठपुरावा केल्याने साक्षीदाराची फसवणूक झालेली संपूर्ण रक्कम ३ लाख ४५ हजार रुपये त्यांच्या खात्यावर परत मिळवून देण्यात आली.

# लांब पल्ल्याच्या एसटी प्रवासात टाकताहेत धापा!

## घाटात बस मागे येण्याचे, बंद पडण्याचे प्रकार | प्रवाशांमध्ये घबराट | देखभाल दुरुस्तीची मागणी

■ **पालघर** : लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी सुरक्षित प्रवास म्हणून एसटी बसची निवड सर्वसामान्य नागरिक करत असतात. मात्र राज्य परिवहन विभागाच्या पालघर विभागातून विविध आगारात सुटणाऱ्या बसेसची दुरवस्था झाली आहे. घाटात चालू बस मागे येण्याचे व बस बंद पडण्याचे प्रकार घडत आहेत. अशा बसमधून प्रवास करताना जीवावर उदार होऊन प्रवाशांना प्रवास करावा लागत असल्याचा घटना वारंवार घडत आहेत. गेल्या आठवड्यात पालघर ते अमळनेर बस पालघर आगारातून सकाळी ६ वाजता सुटली. त्या बसमध्ये साधारण ६० ते ६५ प्रवासी प्रवास करत होते. ही बस त्र्यंबकेश्वरच्या घाटात तीन वेळा चढणावर चढत असताना मागे आली. त्यामुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. अनेकांचे जीव टांगणीला लागले होते. बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधून माहिती दिली व इतक्या लांबवरचा प्रवास कसा करायचा, असा विचार त्यांच्या मनात डोकावला. तसेच मंगळवारी रात्री बोईसर आगारातून बोईसर-कोल्हापूर जाणारी शिवशाही बस पालघर नजीकच्या वाघोबाच्या



■ एसटी बसच्या वेगमर्यादा राखण्यासाठी इंजिनच्या क्षमतेवर मर्यादा (लॉक) बसविण्यात येते. त्यामुळेकाही प्रसंगी घाट चढताना बसच्या इंजिनला कमी प्रमाणात शक्ती मिळत असल्याने अडचणीत निर्माण होतात. नव्याने एसटीच्या ताफ्यातून झालेल्या बीएस-४ प्रणालीच्या बसगाड्यांना सहा गिअर असून अजून अनेक चालकाला पूर्वीच्या पाच गिअर बसगाड्या चालवण्याची सवय असल्याने चढण्याच्या क्षेत्रात खालच्या गिअरवर गाडी चालवण्याचे तंत्र अनेकांनी आत्मसात केले नाही. त्यामुळे योग्यवेळी गिअर न बदलला गेल्याने घाटाच्या भागात अडचणींचा सामना करावा लागतो. यासंदर्भात चालकाला वेळोवेळी प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात असल्याचे त्यांनी पत्रकारांना सांगितले.

घाटातच करकर आवाज करू लागल्याने प्रवासात असतानाच ती बस बदलण्याची नामुष्की ओढावली. राज्य परिवहन विभागाच्या पालघर विभागात ४०० बसगाड्या कार्यरत आहेत. त्यापैकी ११० बसगाड्यांचा वापर लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी केला जात आहे. अशाच प्रकारे प्रवासादरम्यान लांब पल्ल्याच्या बस गाड्या वाटेत नादुरुस्त होण्याचे प्रकार वाढले आहेत. अशावेळी जवळच्या आगारात जाऊन बस दुरुस्त करून घेणे, नव्याने बस मागवणे अथवा प्रवाशांना इतर बस गाड्यांमध्ये बसून देण्याचे प्रकार घडत आहेत. यामुळे ऐन उन्हाळ्याच्या सुट्टीदरम्यान एसटी प्रवासाबाबत प्रवाशांमध्ये नाराजीचे वातावरण पसरले आहे. यासंदर्भात राज्य परिवहन मंडळाच्या पालघर विभागाचे विभागीय संचालक राजेंद्र जगताप यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी सांगितले की, प्रवासात असणाऱ्या सर्व गाड्या प्रवास करण्याच्या योग्यता नियमांमध्ये आहेत. प्रत्येक बस १० लाख किमी अथवा १५ वर्ष आयुष्यमान कालावधी मर्यादेची पूर्तता करत असून, आयुर्मान अथवा प्रवास मर्यादा संपल्यानंतर बसगाड्या भंगारात विकल्या जातात, असे त्यांनी स्पष्ट केले. सर्व बसगाड्यांची देखभाल दुरुस्ती व विशेषता लांब पल्ल्याच्या गाड्यांची देखभाल नियमित केली जात असली तरी अनेक तांत्रिक अडचणी पुढे असल्याची त्यांनी माहिती दिली. पालघर विभागासाठी ११० नवीन बसगाड्यांची मागणी राज्य शासनाकडे करण्यात आली. त्यापैकी १० बसगाड्या प्राप्त झाल्या असून, त्या वसई आगाराला देण्यात आल्या आहेत. इतर नव्या बसगाड्यांची मागणी प्रलंबित असून, त्यासाठी पाठपुरावा सुरू असल्याचे राजेंद्र जगताप यांनी स्पष्ट केले.